# यशोदायिनी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.



REFBK-0003969
REFBK-0003969

कुमार यशोद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता. १५/६/३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता.........

ठाणे

# यशोदायिनी

[ पुस्तक १ लें ]

आवृत्ति २ री.

REFBK-0003969
REFBK-0003969

कुमार यशोद

१९२९.

किमत १० आणे

प्रकाशकः—व्ही. जी. कुलकर्णी,
लक्ष्मीकॉटेज,
विलेपारले—मुंबई.

सर्व हक्क पुस्तक-कर्त्याचे स्वाधीन

मुद्रकः—श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज् प्रेस, ५१३ शनवार पेठ, पुणें शहर.

ताई !

ज्या तुझ्या प्रेमळपणानें
वेळोवेळीं घाई केली नसती
तर हा संग्रह इतक्या लौकर छाप-
ण्याचें माझ्या कधींच मनांत
आलें नसतें, त्या
तुझ्या प्रेमळपणालाच मी माझी
" यशोदायिनी "
अर्पण करतों.

तुझा ' दादा '

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता.........

# अनुक्रमणिका


| अ. नं. | कवितेचें नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | श्रीशारदेच्या पायधुळींत | १- ३ |
| २ | आवाहन | ४- ५ |
| ३ | रम्य बाळपण | ६-८ |
| ४ | लाडक्या तारेस | ९-१० |
| ५ | हास तूं हासच ! | ११-१४ |
| ६ | चिरंजीविनी यशोद | १५-१७ |
| ७ | सालगिरा | १८-१९ |
| ८ | हलवा | २०-२१ |
| ९ | पारिजात-कुसुम | २२-२३ |
| १० | दिव्य-भक्ति | २४-२७ |
| ११ | शकुंतलेचा निरोप | २८-२९ |
| १२ | हरवलेली बासरी | ३०-३१ |
| १३ | आर्यकन्येचे डोहाळे | ३२-३४ |
| १४ | नांव घे | ३५ |
| १५ | कृष्ण-प्रबोधन | ३६-३७ |
| १६ | अंगाई-गीत | ३८-३९ |
| १७ | सारें खरें ! पण- | ४० |
| १८ | जादूगारीण | ४१-४२ |
| १९ | गुढीचा पाडवा | ४३ |
| २० | लाकूडतोड्या आणि खारंगी | ४४ |
| २१ | मूक जीव | ४५-४६ |
| २२ | मंजु-गान | ४७-४८ |

| | | |
|---|---|---|
| २३ | अभागिनीचें गाणें | ४९–५२ |
| २४ | त्याच तारेस ! | ५३–५४ |
| २५ | तूं आहेस तिथें | ५५ |
| २६ | स्वर्गीय संगीत | ५६–५८ |
| २७ | गोड वेड | ५९–६१ |
| २८ | चान्दबिबीचें पुण्यस्मरण | ६२–६३ |
| २९ | श्रीसमर्थ–स्मरण | ६४ |
| ३० | तुझा तिळगूळ | ६५–६६ |
| ३१ | स्वारस्य आहे भवीं ! | ६७ |
| ३२ | अंत किती बघसी ! | ६८–७१ |
| ३३ | परडींतील फुलें | ७२ |
| ३४ | तूंते कळावें कसें ? | ७३ |
| ३५ | हिन्दु–संघटन | ७४–७६ |
| ३६ | रोकडा सवाल | ७७–७९ |
| ३७ | मातृभाषा | ८० |
| ३८ | महाराष्ट्र–यशोगीत | ८१–८२ |
| ३९ | वन्दे मातरम् ! | ८३–८४ |

# प्रस्तावना

सरस्वतीच्या मन्दिरांत पाऊल टाकून उणें पुरें एक तप होतें न होतें तोंच या स्वरूपांत रसिकांपुढें येण्याची कल्पना मला सुद्धां कशीशीच वाटली. कुठें थोडें लिहिलें, कोठें थोडें लिखाण प्रसिद्ध झालें कीं, लगेंच प्रसिद्धपणें जगाच्या पुढें यावें, ही वृत्ति तितकीशी श्लाघ्य नाहीं. पण मनरंजनासाठीं शारदामाईची उपासना केली, जनरंजनासाठीं जनतेसमोर मांडली, जनस्वरूप जनार्दनाच्या मुखीं वसणाऱ्या शारदामाउलीनें ती सेवा गोड करून घेतली; त्याचमुळें थोडी धिटाई येऊन मी हें पाऊल टाकीत आहें. माझ्या कित्येक बंधूंनीं आणि भगिनींनीं प्रोत्साहन दिलें, आणि त्यांच्या आज्ञेला मान देऊन मी आज अशा तऱ्हेनें महाराष्ट्र वाचकांसमोर येण्याचें धाडस करतों आहें. मला जाणीव आहे कीं, मजहून ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा कित्येक थोर कवींच्या कृती आज बाहेर यायला पाहिजेत. कविवर्य **टिळक, Bee, चंद्रशेखर** वगैरेंच्या कवितांचे संग्रह आज मराठी रसिकांना पाहिजे आहेत. असें असतां, त्यांच्या आधीं माझ्यासारख्या बाजारबुणग्यांनींच पुंडपणा करून पुढें सरणें युक्त नव्हे; पण वर निर्देशिलेल्या कारणांस्तव मीं हें जोखीम पत्करलें आहे. रसिक वाङ्मयसेवक माझ्याकडे वत्सलतेनें आणि कौतुकानेंच बघतील, अशी मला आशा वाटते.

माझ्या कवितेच्या वतीनें सांगण्यासारखें विशेष कांहीं नाहींच. शिवाय, बापाला ज्याप्रमाणें आपल्या मुलाच्या अंगचे गुणदोष दिसत नाहींत, त्याचप्रमाणें लेखकाचीही स्थिति असते. तेव्हां माझ्या कवितेच्या रंगारूपाविषयीं वा गुणांविषयीं विशेष जबाबदारीनें बोलण्याच्या भानगडींत न पडतां, तें काम रसिक वाचकांच्या रसज्ञतेवरच सोपविणें श्रेयस्कर; तथापि प्रत्येक कवीच्या वतीनें जें सांगण्यासारखें अथवा वाचकांनीं ध्यानीं आणण्यासारखें असतें, तें माझ्या कवितेसंबंधींही ते मनांत बाळगतील, अशी मी आशा केल्यास अस्थानीं होणार नाहींसें वाटतें. तें म्हणजे एवढेंच कीं, भावना या सर्व मानवांना साधारण अशा आहेत. व ज्यांच्या भावना अधिक तीव्र व उदात्त, त्यांना त्या शब्दांच्या द्वारें इतरांना

अनुभूत करून द्यावयाशा वाटल्यास तें सर्वस्वी स्वाभाविक व श्लाघ्य समजलें जावें. असो. कविवर्य टिळकांप्रमाणें:--

कारण कवनें नच माझीं,
नच तुमचीं, मी गातों जीं
हीं निःश्वसितें
कोण सोडितें
मम हृदयीं, तें
विचारुनी भिउनी त्याला
पुढें करा कर मग अपुला.

असें म्हणण्याइतका आत्मविश्वास जरी माझ्या अंगीं नसला, तरी माझ्या काळांतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कविवर्य श्री. तांबे यांच्याप्रमाणें:--

घरिं मुलें
तशीं हीं फुलें
हृड, वत्सलें
लोचनें बघणें
कुस्करूं नका हीं सुमनें !

असें मात्र रसिकांस विनम्रपणें विनविल्याशिवाय रहावत नाहीं.

हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करतांना अनेक सन्मित्रांचें अमूप साहाय्य मला झालें आहे. त्या सर्वांचा मी अतिशय आभारी आहें. नांवेंच घ्यावयाचीं झाल्यास असें म्हणतां येईल कीं, श्री. वामनराव कुलकर्णी (वांद्रे), श्री. बाबूराव राणे ( मालक राजापुरकर नाटक मंडळी ), श्री. भैरव दि. गांगल, बी. ए. ( वसई ), महाराष्ट्र-कुटुंब-मालेचे सम्पादक व प्रकाशक, इत्यादिकांच्या प्रेमळ सहानुभूतीवाचून या दिव्यांतून पार पडणें मला प्रायः अशक्य होतें. या सर्व सज्जनांचा मी ऋणाईत आहें.

पुण्याच्या राजगुरु आणि कंपनीच्या उत्साही मालकांनीं आणि व्यवस्थापकांनीं हें पुस्तक सुबक करण्याकरतां ज्या सूचना केल्या व जे श्रम घेतले, त्यांबद्दल मी त्यांचाही अत्यंत आभारी आहें. इति शम्

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

'यशोदायिनी'ची पहिली आवृत्ति पुष्कळच लवकरच खलास झाली. आधुनिक मराठी कवितेच्या भाग्योदयाचेंच हें पूर्वचिन्ह नाहीं, असें कोण म्हणेल ? यशोदायिनीचा दुसरा भाग प्रसिद्ध करण्याबद्दल माझ्या पुष्कळ सन्मान्य मित्रांकडून व चहात्यांकडून प्रेमाच्या सूचना आल्या असतांही निरनिराळ्या कारणांमुळें तो बेत थोडा लांबणीवर टाकून याच भागाची ही दुसरी आवृत्ति आज रसिकांस सादर करीत आहें. या आवृत्तींत फरक केलाच असला तर तो गेल्या आवृत्तींतील मुद्रणाच्या चुका सुधारण्यापुरता केला आहे.

पहिल्या आवृत्तीच्या वेळीं ज्या ज्या सन्मित्रांनीं मला अमोल मदत केली त्यांचे उतराई होणें कठीण आहे येवढेंच या ठिकाणीं कृतज्ञतेनें नमूद करावेसें वाटतें. निरनिराळ्या वृत्तपत्रकारांनीं आणि मासिककर्त्यांनीं 'यशोदायिनी'वर आपलीं निर्भीड मतें देऊन मला उपकृतच केलें आहे.

वऱ्हाड नागपूरच्या शाळाखात्यानें लायब्ऱ्यांकरतां मंजूर करून आणि पुण्याच्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसायटीनें प्रशंसापत्र देऊन यशोदायिनीविषयींची गुणग्राहकता व्यक्त केली याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

डोंगरे बंगला,<br>
विलेपारलें,<br>
विजयादशमी, शके १८५१

रसिकांचा पाईक<br>
**कुमार यशोद**

# यशोदायिनी

दा. क्र. ३९६९.

## १. श्रीशारदेच्या पायधुळींत

[ वृत्त:—अभंग ]

१

कुणि निंदा, कुणी वंदा । मी या देवतेचा बंदा !
पत्र, पुष्प, फल, तोय । पायिं वेचिलें सर्वस्व
हिच्यासाठीं वेडा झालों । आप्तपाश विसरलों
बाप म्हणे, वेडा झाला । भलत्या नादें बिघडला
आई म्हणे, वेडें बाळ । काय पुसूं त्याचे हाल !
बंधू म्हणती, बहकला । सटवीनें हा भारीला
आप्त मोडिताती बोटें । कुळबुडवें हें करंटें
याचें याजला कल्याण । कळेनाच हा अजाण
कुणी कांहीं बोलो वाचें । छत्र माझ्यावर देवीचें !

२

हिच्या कटाक्षांच्या मार्गें । धावतां ना जीव भागे
हिच्या एका शब्दासाठीं । जाहला हा देह कष्टी
हिच्या दर्शनाकारणें । वेचियेलें सर्व जिणें
तप केलें हिच्यासाठीं । तपाअंतीं झाली भेटी
सोहळा तो त्या भेटीचा । काय वर्णूं शके वाचा

वाचा जाहली कुंठित । वृत्ति जाहल्या स्तिमित
नुरे कांहीं देहभान । पायिं घेतली लोळण
विश्व सारें एकया गुणें । हिच्या रूपीं भरलें जाणें !

३

हिनें चेटूक हो केलें । सारें विश्व खुलें झालें
हिनें झेलितां पदरीं । चंद्रसूर्य माझ्या दारीं
लौकिकांतलें वैभव । लाथाळिलें स्वयमेव
मला चाड ना कीर्तीची । बोलभांड सटवी कुठची
शिवेतराच्या[1] क्षयार्थ नाहीं वेचिला शब्दार्थ
हिच्यासंगें सारें शिव । अशिवानें दिला जीव
शिवाची ही सून भली । शिवाहूनही आगळी
शिव जगाला संहारी । तामसी, छांदिष्ट भारी
दिव्य नव्या चैतन्याला । नित्य ओतिते ही बाला !

४

हिच्या दर्शनीं प्रसाद । हिच्या शब्दीं ब्रह्मानंद
हिच्या वीणेच्या झंकारें । स्फूर्तीचें हें शिरलें वारें
यशोदायिनी देवता । हीच माझी माता पिता
माता पिता आप्तबंधू । सारे वैभवाचे बंधू
बंधु विस्मरे बंधूला । जगाचा हा न्याय भला
भलें त्याचेंच जीवन । जेणें साधिला वाग्यज्ञ
यज्ञ वाचें आरंभिला । आत्माहुति दिली त्याला
आत्मा अजर अमर । हें तों वेदान्ताचें सार

---

१ काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।—मम्मट.

मला कशाला वेदान्त । मतीमंद मी मुळांत
म्हणोनी या पायीं आलों । हिच्या रूपीं लीन झालों !

५

कृपा केली देवतेनें । थोपटीलें करें जाणें
विश्वीं कोंदला प्रकाश । दिव्यानंदानें आकाश
हिच्या पायीं जडे छंद । आतां आनंदी-आनंद
हिच्या पायींच्या धुळींत । सौंदर्याचे स्वर्ग सात
आकळाया त्या सौंदर्या । लोळतों मी धुळींत या !

मिरज १३ मे १९२६

---

## २. आवाहन

[ चालः—जरि नाहिं कमल तें ]

तूं फुला, फूल लौकरी। रसिक मी करीं
धरिन मग तुजला,
गाईन गोड कवितेला. १

तूं हास तारके, अशी। चमक दिननिशीं
माझिया हृदयीं
कर जागी कवितादेवी ! २

निर्झरा ! हसुनि तूं जरा। खुलव प्रियकरा
स्फूर्ति ही माझी
रुसुनियां अजुनि बसली जी ! ३

तूं बोल सारिके, लोल। तेच गे बोल।
लोपले हृदयीं
जे माझ्या अजवरि बाई ! ४

ये लते सोड लाजरी। वृत्ति बावरी
डोल प्रेमानें
भर माझें हृद गानानें ५

कोकिळे ! गाच तूं बाई। नवी नवलाइ
ऐकुंद्या कानीं
गाउंद्या नवनवीं गाणीं ! ६

ये निसर्ग-देवी, झणी ! काढ गवसणी
आजवर मळली
कवितेच्या वीणेवरली ! ७

ये हृदयींच्या देवते ! पुरे मौन तें
घेच ही वीणा
कर स्पर्श हळुच तारांना ८

तव कर स्पर्श जादुचा । होऊं दे असा
पहा आश्चर्य
नादें जग भुललें सर्व ! ९

त्या नादब्रह्में सखे ! करिन बोलकें
मुक्या जगताला
डुलवीन खऱ्या रसिकाला ! १०

लारखाना (सिंध), १० जानेवारी १९२३

---

# ३. रम्य बाळपण

बालक व्हावें मौजेंत पुन्हां खेळावें ! ध्रु.

पाटी दप्तर करीं घेउनी
रमत गमत शाळेंत जाउनी,
कांहीं तरि तो धडाहि शिकुनी
परत घरिं यावें। खाऊस्तव रुसुनि बसावें ! १

पुन्हां घेउनी करिं विटिदांडू
खेळावें, मौजेनें चेंडू
खेळत मित्रांसंगें भांडूं !
उगिच भांडावें। क्षण जातां विसरुनि जावें ! २

गळ्यांत घालुनि कर मित्राच्या
गोष्टी सांगाव्या मौजेच्या
राक्षस, पिशाच आणि परीच्या
भान हरावें। खदखदा पुन्हां हासावें ! ३

अभ्यासामधिं बहीण रमली.
मागुनि जाउनि चोर-पावलीं
डोळे झाकावे कर-युगुलीं,
हसुनि हसवावें। रडवावें; परि न रडावें ! ४

बसतां आजी देवापुढतीं
डोळे मिटले स्मरणी हातीं
हळूच ओढुनि माळ तिची ती
पसारचि व्हावें ! कोठेंही दडुनि बसावें ! ५




अभ्यासामधिं वहीण रमली
मागुनि जाउनि चोरपावलीं
डोळे झाकावे करयुगुलीं !

( रम्य बालपण, पान ६ )

फोटोग्राफर–नाईक कं० पुणें. ]

'अरे गुलामा !' म्हणतच रागें
धावत आजी येतां मागें,
लपतां कोठें कणगी-मागें
तिनें पकडावें। धरुनि गालगुच्चे घ्यावे ! ६

डोळा चुकवुनि आंगणिं जावें,
हळुच वासरूं सोडुनि द्यावें,
धावत मागें मग लागावें,
धरुनि आणावें। बाबांनीं मग बदडावें ! ७

खाऊ, खेळ जिवाचे दोस्त,
अभ्यासावरि कुठलें चित्त ?
शाळेचें कधिं करुनि निमित्त
कुठें तरि जावें। मोडुनी पाय घरें यावें ! ८

तूप चोळितां पुसते माय,
"खाउनि सांजा राहिल काय ?"
कण्हत म्हणावें 'हूं-अं-हाय !'
नेत्र मिटावे। खाउनी उगेच कण्हावें ! ९

'गोष्ट सांग ना आजी' म्हणुनी
गोधडी तिची बळें ओढुनी,
गुलगुलीत त्या शरिरा बिलगुनि
तिला मारावें। गोष्ट ऐकतां झोपावें ! १०

कांहीं पाहुनि विस्मित व्हावें !
नवें तेवढें आपणा व्हावें !
लाभ न होतां रुसुनि बसावें !
उगेच रडावें। क्षण जातां उगिच हसावें ! ११

'बाळपणींचा काळ सुखाचा!'
पुनरपि येइल जरि मौजेचा,
सोडुनि प्रौढपणा कष्टाचा
बालक व्हाया। राजी न कोण? सांगा या! १२

वसई, ११ आक्टोबर १९२६

---

# ४. लाडक्या तारेस

[ चाल:--दिवस शांततेचे मनोहर आश्विनमासाचे]

बोल, गडे तारे। बोल ते गोड तुझे 'हांहूं'
क्षणभर विसरूं दे। जगाचा ताप, हास पाहूं!
तूं माझी कन्या। तुझा मी धर्मपिता तारे,
तुजसाठीं वाटे! चमकती आकाशीं तारे!
कोण कुणाची तूं। मला परि लाविलेंस वेड
देवहि भुलतील। बघुनि हें रूप तुझें गोड!
तव सदनीं येतां। सांग, कां तुज होतो हर्ष?
दुग्धपान त्यजुनी। दुडदुडा धावत येत्येस।
कटि खांदे बसुनी। खेळसी, हासविशी, हससी
हां हूं शब्द तुझे। बोलुनी सकलां मोहविसी.
हेच तुझे हांहूं। निरर्थक आज अम्हा गमती,
जगा भुलविणारीं। उद्यांचीं उज्वल काव्यें तीं!
अस्फुट शब्दांनीं। बोलसी काय असें गूढ?
विचारवंतांना। कळेना अर्थ, करिसि मूढ!
त्या हांहूं साठीं। जाहलों तारे मी वेडा,
आतुर ऐकाया। जीव मम हो थोडा थोडा!
झोपेमधिं येती। तुझे ते हांहूं ऐकाया
हात पुढें करितों। तुला मी हृदयीं कवळाया!
दचकुनि हो जागा। हाय! तें स्वप्न सर्व कळतें:
परी तुझें हां हूं। सारखें कानीं बघ घुमतें!

तुजला पाहाया । आणि तव हांहूं ऐकाया
धावत मी येतों । टाकुनी कसल्याही कार्या !
गोल तुझे गाल । आणि हे लालबुंद ओठ
असे चुंबितांना । तुच्छ मज वाटे वैकुंठ !
हृदयिं कवळतांना । अशी ही कोमल तव काया
फोडुनि बाहिर ये । वाटे वत्सलता हृदया !
हृदयीं या वसतें । जें गडे अमूर्तसें कांहीं,
तेंच तुझ्या रूपें । प्रगटलें काय सखे बाई !
तूं माझ्या काव्या । अर्पिलें नवीन चैतन्य
फुलें, मुलें, तारे । कवींचे सखे-नव्हे प्राण !
म्हणतों थट्टेनें । तुला मी दत्तक घेईन
कुठलें तें भाग्य ! अभागी, हृदयभग्न, दीन !
होइल काय पुढें । कळे का नेमानेम कुणा ?
तूं सौख्यासाठीं । संकटें मजभवतीं नाना !
आई तव असतों । तरी तव चिरसहवासाचें,
दिव्य प्रीतीचें । लाभतें भाग्य मला साचें ।
भाऊ तव असतों ! लाडके, तरि तुज खेळवितों,
कवी जसा रसिका । तसा तुज रंजवुनी रमतों !
कशास या भलत्या । कल्पना ! या जन्मीं नाहीं,
पुढील तरि तारे । कन्यका होशिल का बाई !
लाडिक तव हास्य । आणि मधु चुम्बन गालाचें
हेंच पुरे आज । त्यांत मम काव्य पहा नाचें ।

पुणें २७ जुलै १९२४

---

# ५. हास तूं हासच !

( जिच्या हासण्याचें एवढें काव्य झालें, तिच्याशिवाय दुसऱ्या कुणाला ही कविता अर्पण करण्याचा मला तरी काय अधिकार ?

—कुमार यशोद )

[ चाल:—पुरे पुरे ग हें हसणें ]

हास गडे ग, हास अशी
हं चालूं दे, हास कशी !
        हास्यमया बाला बनली
        हास्य दिसें तिज भवताली.
हास्यमय स्थिरचर झालें
हास्याविण कांहीं नुरलें
        हसे बालिका,
        हसली कलिका,
हास्याचा ध्वनि एक तिथें,
दुजें कुणाला भान असे ? १
        कुणास ठावें हसली कां ?
        कुणास ठावें हसलों कां ?
कुणास ठावें कां झालें
हास्यमय ब्रह्मांड खुलें ?
        सारखी हसे,
        सारसा हसें,
        सारखें हसें;

ती, मी, जग, सगळे हसलों !
हसलों परि नाहीं दमलों ! २

बाला हसली, कवि हसला,
हास्य मिळालें हास्याला !

शब्दब्रह्म हसें तेथें !
नादब्रह्म हसें तेथें !

अधर हालतां,
रदन चमकतां,
नयन विकसतां,

हासें झालें मी-तूंचें,
हास्याविण कांहिं न गवसें ! ३

'पुरे' पुरे ग हें हसणें
किती हसावें मनुजानें ?'

कोण वदे ही कवयित्री
नैराश्याची जनयित्री ?

पुरे हासणें,
पुरे खेळणें,
पुरे खिदळणें !

काय उरे मग बाल्यांत ?
काय उरे मग जगतांत ? ४

शक्य तोंवरी हास गडे,
हास्यानें करि जग वेडें !

नैराश्याचे विकट धडे
कशास इतुक्यांतच वेडे !

---

१ अशी एक कै. सौ. मनोरमाबाई रानडे यांची मनोरम कविता आहे.

वैषम्याचे,<br>
वैराग्याचे<br>
दुर्दिन साचे<br>
असति लांब तोंवरि हास,<br>
विसरुनि विश्वा गे हास ५

हास गडे, तूं हास, अशी<br>
हसुनि हासवीं जगतासी !<br>
पुन्हां एकदां हसुनि अशी<br>
निराश हृदयें खुलव कशी<br>
हास एकदां,<br>
हास पाहुंद्या,<br>
हसुनि सर्वदा<br>
जीं न कधीं हासायाचीं,<br>
तीं हृदयें कर हसतिलशीं ! ६

मेलेलीं अमुचीं आस्यें<br>
पुन्हां हासतिल तव हास्यें !<br>
या असल्या हास्यासाठीं<br>
कवि उधळिल कवितासृष्टी !<br>
प्रेमा मुकला,<br>
जीवा विटला,<br>
जगता मेला,<br>
हास्य तुझें हसवील तया,<br>
म्हणुनि हास गे, करीं दया ! ७

दुनियेचीं दुस्सह दुःखें<br>
क्षणभर मजला विसरूं दे !

लकेरींत मधु हास्याच्या
विरूं देत मम वृत्ति पिशा !
कंटकशल्यें
विसरुनि बाले,
हसेन विमले,
म्हणुनि सांगतों पुन्हां अशी
गोड बालिके, हास कशी ! ८

× × ×

कवि बसला लिहिण्या कविता
काव्य राहिलें, हसे स्वतां !
स्फूर्ति हसे, कल्पना हसे,
प्रिया लेखणी तीहि हसे !
शब्द हासले,
अर्थ हासले,
काव्य हासलें !
कवितेचें झालें हासें,
हास्य एक उरलें खासें ! ९

पुणें, १२ आगस्ट १९२३

---

# ६. चिरंजीविनी यशोद

[ चालः—अदय काय होइ माय ]

बघुनि बालिके तुला, मलाहि न भान राहतें ! धृ.
चांदण्या नभांतल्या
अहह ! काय निखळल्या
भूमिलागि पातल्या ? बघुनि नयन वाटतें ! १
कचसुनील-मेघजालिं
इंद्रचाप सज्ज भालिं
बघुनि वृत्रशत्रुचीहि चित्तवृत्ति थरकते ! २
हासरे कपोल गोल,
काश्मिरी गुलाब लोल,
चम्पकी कळी सुढाळ त्या गुलाबिं शोभते ! ३
मंगळा ! सुमंगला।
विशाल भालिं लाभला
वास ह्या तुला, सहर्ष नाचतोस योग्य तें ! ४
नाच, हास मंगळा,
सर्वही अभंगळा—
हरुनि ठेव पूर्ण सौख्य बालरूप दवते ! ५
ओठ लाल, जिवणि रुंद,
दन्तपंक्ति शुभ्रकुन्द,
विपुल केशसंहती विमुक्तबंध लोळते ! ६

नाचरी विभावरी,
प्रभात मुग्ध, हासरी,
कचसुहास्यि घ्या बघून आणि संगमा वरी ! ७

सप्ततंत्रि-मंजुनाद
थांबले श्रवून शब्द,
लोटले न अजुनि अब्द चारही मुलीस ते ! ८

चिमुकल्याच अवयवीं
चारुता नवी नवी
प्रगटवी अमानवी ! विमोहवीत चित्त तें ! ९

पाखरापरी मधून
धावते तरूंमधून,
पाखरूं नका धरूंच कोणि, खेळुं स्वैर तें ! १०

पाहतां मला दुरून
धिटुकली बघे हसून,
जाय बाहतां पळून, मृगशिशूच धावतें ? ११

अर्थशून्य मंजु गान
अधरिं गुंजते बघून
गानशूर होति लीन, भान सर्व हरपतें ! १२

चालतां पथीं तुझ्या
बालसुलभ ज्या मजा,
मुरडुनी कितीक नेत्र पाहतात कौतुकें ! १३

फूल-पांखरूं सुरंग
भुलवितें कुणा न सांग ?
मुक्तसंग वा पशूसही विमोहिं पाडिते ! १४




त्वदीय दिव्य चारुता
जरि मिळेल अंशता
मदीय काव्यबालिकेस तरि बनेल दिव्य ते !

फोटोग्राफर–रेक्स स्टूडिओ, मुंबई. ] ( चिरंजीविनी यशोद, पान १७)

भ्रष्टशाप देवता
अवतरे कुणी स्वतां ?
दिव्यता विलोकितांच ताप सर्व शमविते ! १५
माउलीस ना तुला,
प्रसवली अशा तुला !
प्रभो ! चिरं सुखांत ठेविं, तेवि दीर्घ आयु दे ! १६
नांवही तुला दिलें
मीं ' यशोद ' आपलें
एकवार ऐक गीत, हास आणखी बरें ! १७
हास एकदां बघून,
बोल एकदां हसून,
मग मदीय काव्यगानिं डोलवीन रसिकते ! १८
त्वदीय दिव्य चारुता
जरि मिळेल अंशतां
मदीय काव्य-बालिकेस, तरि बनेल दिव्य ते ! १९

वसई, ५ सप्टेंबर १९२६

---

## ७. साल्गिरा

[ चालः—सारंगि सारखी तव वाजवुनी ]

साल्गिरा[1] आज तव ऊठ राजसा, टाकीं पद नवसालीं! ध्रृ०

चल सुखाच्या नव्य भवनीं,
जीवनाच्या मंजुगानीं,
या मंगल दिनिं ये गाऊं आपण अतुल सुखाचीं गाणीं ! १

उगवला हा अंशुमाली,
चटक फुलली फूलवेली,
तुज भेटायाला सुमुहूर्तीं या येती वैभवशाली ! २

वदनकलिका झणिं फुलूं दे
आणि विश्वा हासवूं दे,
कर हास्य-मुखानें स्वागत त्यांचें, घे आशीर्वच भालीं ! ३

ठेविसी पाऊल दारीं
या जगाच्या, कर तयारी,
आयुष्य सुखाचा झरा ओळखीं, कर जीवित सुखकारी ! ४

दैव योगायोग बापा,
आळशाच्या व्यर्थ थापा,
तूं स्वतांच राजा दैवाचा तव, प्रभु कर्त्याचा वाली ! ५

---

१ वाढ दिवस.

भव्य विश्वाचा पसारा,
हा तुझ्यासाठीं उदारा,
मांडिला प्रभूनें, लूट सुखाची खाण, होईं जयशाली ! ६
प्रेममय आयुष्य बनवीं !
कर्ममय आयुष्य बनवीं !
चल एक एक टाकीत पावला नव वर्षाच्या दारीं ! ७

अंधेरी, ता. २६ डिसेंबर १९२६

---

# ८. हलवा

—:०:—

[ वृत्तः—भूपतिवैभव ]

किति सुरेख हलवा झाला बघ हा आई,
चान्दण्याच जणुं या खालीं आल्या बाई !
अपुल्याच सारखा हलवा वरती करिते
ती सृष्टिसती, जग तारा त्यांना म्हणतें !
ही आकाशाची कढई उलटी करुन
बघ हलवा करिते निसर्गदेवी छान !
निज करें हालवी हलती तेव्हां सारे
एकादा चुकुनी पडे पहा परभारें.
या इतक्या मोठ्या कढईखालीं आंच
द्यायास जणों जातसे सूर्य रात्रीस.
स्वर्गांत फारसें नसेल केशर म्हणुनी
हा एकच मंगळ तिनें बनविला जपुनी !
अर्धाच दिसे जाहला हिचा हा हलवा;
किति बारिक दाणे अजून दिसती पाहा.
कांहींवर आले काटे किति तरि छान,
कांहींवर काटे मुळीं न दिसती जाण !
हा सुंदर हलवा पुरा कधीं व्हायाचा ?
दर रात्रीं बघतां अपुरा दिसतो साचा.
कधिं संपवील ही हलवा असला छान ?

## हलवा

कधिं अम्हास वाटेल ? पडे कशाची वाण ?
का पाक संपला असेल तीचा आई ?
मग नवीन कां ही दुसरा बनवित नाहीं ?
मज पंख जरी देवानें दिधले असते
जाउनी साखऱ्या दिधला असता तीतें.
हे दाणे पटपट जर खालीं पडतील
तर आईग, ती मौज किती होईल !
ही निसर्गदेवी कोणासाठीं करिते-
हा इतुका हलवा ? गूढ एक हें मातें !

पुणें, १४ जानेवारी १९२६.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ३९९९.

---

# ९. पारिजात कुसुम

[ चालः---सह्याद्रीच्या तळीं शोभतें. ]

परकर वळवुनि पाठीमागुनि ओचे खोवुनि दिले,
मृदुल करांनीं भुरभुरणारे केसहि ते सारिले.
करुनि तयारी पारिजातकासमीप ती पातली.
डुलत हसत वर चढे तेधवां मौज मना वाटली.
झरझर चढुनी बसे 'कुसुम' मग प्रशस्त फांदीवरी,
निमिष विसावा घेउनि हासे बोलुनि कांहीं तरी.
हसे जेधवां इवलेसे ते ओठ करुनि बाजुला
इवल्या नाजुक रदकलिका तैं चमकतात उज्वला.
बालरवीचे किरण कोवळे, पिवळे, तांबुस किती
नाचत हसऱ्या गालांसंगें झिम्मा ते खेळती.
कूजन करिते वटवृक्षावर मधुर कोकिळा तिथें,
तिला विसरुनी हिला पाहुनी मन गाऊं लागतें.
पखरण करण्या कुसुम सुमांची फांदीवर नाचते,
तिच्या गोड त्या नाचासंगें मन माझें नाचतें.
थांब जराशी कुसुम ! जिवाला गिरकी ये वाटतें;
पडेन मी, मग कोण सावरिल ? थांब म्हणुनि बालिके !
कशास पण छे !--चालूं दे तव नाच असा मोहक,
त्यांत गुंगतां गिरकी येवो ! दिव्य दिव्य तें सुख !
नाच गडे, मी नाचत राहिन कल्पान्तावरि असा;
असा नाचतां विरुनि जाउं दे काया अन् ही रसा !
थांबलीस का नाचनाचतां ? बसलिस फांदीवरी ?
दमलिस बाळे, नाचुनि नाचुनि, गा गाणें सत्वरी.

गा गा कुसुमा ! उघड उघड त्या ओठांच्या पाकळ्या
गाच मोहना, मुरलिधरा गा, कर वृत्ती मोकळ्या.
पारिजात नच कदम्ब वाटे, तूंही बन्सीधर !
मीपण हरलें, मलाहि वाटे गोपगडी मी तर !
गाच गड्या, मग पुन्हां ऐकूं दे मुरली मंजुध्वनी,
पुन्हां एकदां अम्हां डुलूंदे दिव्य तुझ्या गायनीं.
तुझ्या मुखींची मला बनूंदे मुरली, मग स्फूर्तिनें
त्यांतुनि स्थिरचर भुलेल असलीं दिव्य काढ गायनें
गीत नाचतें अधरावरतीं अस्फुट, कां पण अडे ?
ऐकूं दे मज, जीव भुकेला, वेडच त्याचें जडे !
कोण कोठली, परि मन होई वेडें तुज पाहुनी,
कुणास ठावें कोण उद्यांचा रसिक तुझा गे धनी ?
चिंता मजला नाहीं त्याची, कारण तूं लाडकी-
परमेशाची, तुला कशाची वाण ? सदाची सुखी !
आज मला परि ऐकूं दे तव अस्फुट मंजु ध्वनी,
ठेवूं दे गोवुनी रूप हें मुग्ध मधुर गायनीं,
वेचूं दे मज दोन चार त्या आनंदाच्या कळ्या,
तुझ्या पदाच्या आघातानें खालीं ज्या पातल्या,
तुझ्या कराचें आन्दोलन त्या फांद्यांना लाभतें,
फांदी होउनि तुझ्या करीं मज नाचावें वाटतें !
करस्पर्श तो दिव्य तुझा लाभावा म्हणुनी फुलें
टपटप गळती वृक्षावरुनी सोडुनि घर आपुलें
त्या कुसुमाचा मला जन्म का नाहिंस देवा, दिला !
इथें भूवरीं, या 'कुसुम'-करीं स्वर्ग पाहतों भला !

पुणें, १५ आक्टोबर १९२५.

---

# १०. दिव्य भक्ति

[ चालः— नृपममता रामावरती ]

श्रीकृष्णदर्शनोत्कंठा। राधिका नंदगृहिं आली। गोरटी
सौंदर्यदेवता सजली। नेसली चीर जरतारी। पोपटी
वेचुनी फुलें बकुळीचीं। गुंफिली माळ हरिसाठीं। गोमटी
तो देव। तिचा तो जीव
हृदयराजीव
खुलविलें ज्यानें
मोहना त्यास बघण्याला। घातली १

भिरभीर चहुंकडे पाहे। हरिणाक्षि काय भवताली। पवढें
तों तिला यशोदा दिसली। लाजली, थबकली, थिजली! गडबडे
" राधिके, अशा नयनांनीं। करिशील जगाला वेडें। ये गडे!"
लाजली। हळुच हासली,
'इश्श!' बोलली
राधिका बाला
परि चित्त लागलें सारें! हरिकडे २

" काय ग अशी बघत्येस? विसरलीस कोठें काय। शोधिसी?
बावरें चित्त कां झालें? मोहिनी कशाची पडली। तुज अशी?
तिन्हिसांजा टळुनी गेल्या! भ्यालिस कीं कोठें काय? वद मसी
कीं कुणीं। तुला पाहुनी
सजुनि सावरुनि
अशी येतांना
अडविलें? त्रास कुणीं दिधला? सांग गे." ३

उचालिले नेत्र राधेनें । पाहिलें एकदां वरती । तिजकडे
हासली यशोदा तेव्हां । राधिका पुन्हा बावरली । ये रडें
" नाहिं-हो-मि-गेल्यें होत्यें । राउळीं दर्शना विभुच्या नदिकडे
परतलें । घरीं चाललें
क्षण इथें आलें
तुम्हा भेटाया "
परि चित्त लागलें सारें । हरिकडे. ४

" दमलीस, बसूं ये बाई ! वृंदावनिं बोलत राधे । घडिभरीं
अजि आलिस बहुता दिवशीं । नाहिं ना कशाची घाई । तुज घरीं ?
वाळलीस कां ग इतुकी ? सासू का करिते जाच । दिनभरी ?
तुज अशी । बघुनि खिन्नशी
वाटतें मसी
दृष्ट काढावी
हें गोड रूप तव बाई ! मन हरी ! " ५

चालला रवी अस्ताला । क्षितिजावरि किरणें पिवळीं । पसरलीं
पक्षिकुळें बहु मोदानें । गात गात निजसुखधामीं । परतलीं
दुरि ऐकुनि रव मातेचा । हंबरुनि वासरें नाचूं । लागलीं
" दश दिशा । दिसति खिन्नशा
कां बरें अशा ? "
राधिका बोले
परि चित्त लागलें सारें । हरिकडे ६

"तूं खिन्न, दशदिशा म्हणुनि । वाटती खिन्न, कां नयनीं । जळ भरें ?
कां उदासवाणी चर्या ! तुज वाण कशाची पडली । वद बरें ?
कटि खांदे खेळविण्याला । तुज अजुनि बाळ ना झालें । गोजिरें
औदास्य । खिन्न हें आस्य,

म्हणुनि कां हास्य
लोपलें मुखिचें ?
उमगलें गूज तव मनिंचें । राधिके ! ” ७

विफलाश राधिका उठली । जावया, दीर्घ निश्वासा । सोडुनी
“थांब अं !” यशोदा वदली ! “आलेंच दीप प्रभुपुढती । लावुनी
वनमाळी येइल आतां । दूधवाटि ठेवुनि येतें । काढुनी”
मनिं हसे । राधिका, बसे
लागलें पिसें
हरिसि पाहाया । हरिसि भेटाया
मग चित्त लागलें सारें । हरिकडे ! ८

वृंदावनिं कोनाड्यांत । मिणमीण दीपिका जळतां । देखिली
स्वस्थिती मनीं येवोनी । तिळतीळ जीव तुटतांना । कष्टली
काजळी दिव्याच्या वरची । काढाया नाजुक बाला । सज्जली
तों भ्रमें । हरी ये गमें
म्हणुनि संभ्रमें
बघे भवताली
ज्योतींत अंगुली राही । जळतची ! ९

“मी मोठा झाल्यावरती । वसवीन जळीं कनकाची । द्वारका !”
शब्द तोंच कर्णी आले । देहभान विसरुनि गेली । राधिका
वळाविलें वदन, मन तिकडे । पाहिलें हरीनें, थबके । हो मुका
“ हें काय ? राधिके ! हाय । ”
वदतची जाय
अती वेगानें
झडकरी करें कर काढी । हरि तिचा ! १०

भरजरी पितांबर भारी । टरटरा फाडिला हरिनें । तेधवां

बांधिलें बोट राधेचें । तेलांत भिजवुनी चिंधी । तेधवां
सावरी हरी मग तिजला । पाठीवरि कर फिरवोनी । तेधवां
तो स्पर्श । उपजवी हर्ष
मनीं बेहोष
राधिका बाला
मोह मोहिनीचा पडला मोहना ! ११

तें रूप, स्थिति, ती भक्ती । पाहुनी जगज्जीवनही । गहिंवरे
“ राधिके, तुझ्या भक्तीची । उज्ज्वलता बघ ही बाई ! अवतरे
अंगुली मृदुल तव जळली । परि काळिज मम चरचरलें ! कां बरें ?
तूं धन्य । हो जगा मान्य
वदोत वदान्य
“ स्फूर्ति कृष्णाची,
भक्तीची प्रतिमा साची । राधिका ” १२

× × × +

अनुष्टुप्—धन्य ती भक्ति राधेची । स्वात्मविस्मृति निस्तुला !
भक्तिनें अर्पितो काव्य कवि त्या दिव्य भक्तिला !

वसई, २५ जून १९२६

## ११. शकुंतलेचा निरोप

[ चाल:—सुरेख संगम किती ]

जातें तुम्हांला टाकून सख्यानों ! जातें तुम्हांला टाकून ! ध्रु०

कित आवडिचें हीं मृगबाळें
ओढितातो पदर मम बळें
अश्रु डोळ्यांत बघती आणून् ! सख्यानों ! १

हा बकुलवृक्ष मज गमे
टपटपा गाळितो सुमें-
नच सुमें अश्रु कढकढून् २

ही प्रितीचि माधवि लता
जाणें सोडून आलें अतां,
जणुं आलिंगिते खालें लवून् ३

हे अभागि गर्भिणि मृगी,
नको मागें येऊं. रहा उगी.
बघुं नको अशी फिरफिरून् । ४

सखे प्रियंवदे, कधिं अजून्
क्षण गेला न तुमच्यावाचून्
कशि राहूं तुम्हाला सोडून् ! ५

रक्षियेलें शकुंतीं मला,
नांव ठेवीलें प्रेमें शकुंतला.
ताता, तुम्हीं पाळिलें तिथून् ! ६

किती लाडें लाडें वागवीलें,

किती माझे कोड पुरविले<br>
कांहीं दिलें न कधिं उणें पडून् ! ७

अभागिनी, कष्ट तुम्हां दिले<br>
कांहो ताता, भरवितां डोळे ?<br>
फुटुं पाहे हृदय चूर होऊन् ८

प्रेम साऱ्यांचें मज लाभलें;<br>
आतां आठवुन रडणें आलें !<br>
काय कळे न विधि ठेवि लिहून् ! ९

वसई, ११ जुलै १९२६.

---

## १२. हरवलेली बासरी

[ चाल:—त्यजिं भक्तासाठीं लाज ]

राधिके, हरीची मुरली
      लपविलीस कोठें सांग ? धृ०
मुरलिचा लागला ध्यास
भलतेंच वदे भलत्यास
      विसरला भूक अन् गाई
      मुरलीविण न सुचे कांहीं ! १
मीं दहीभात कालविला
हरि त्याला नाहीं शिवला
      मुरलीचा एकच चाळा
      लपविलीस कोठें सांग ? २
चालला वनीं वनमाळी
करिं यष्टि कांबळी काळी
      मुरलिची आठवण झाली
      तों अश्रुपूर ये नयनीं ! ३
'राधिका, राधिका' बोले
स्वप्नांत 'राधिका' बरळे !
      मोहिनी घालुनी मुरली
      लपविलीस कोठें सांग ? ४

'राधेचे घरिं जाईन,
बांसरी तिला मागेन !
चुंबुनि प्रीतिनें, हृदयीं
कवटाळुनि देइल मुरली ! ५

जाउं का घरीं राधेच्या ?'
घडि घडि विचारी साचा
करुं काय जाहला वेडा
दे गडे हरीची मुरली ! ६

तूं राधे, दिससी भोळी
भुलविला कसा वनमाळी !
जग घेइल भलती आळी
हें योग्य नव्हे ! दे मुरली ! ७

मीं असा निजविला त्याला
तों आलिस तूं वेल्हाळा—
बोलत कां नाहिंस राधे ?
'हरवली–हरीची–मुरली !' ८

× × ×

नेत्राब्जांतुनि आसवें घळघळा वाहूं तिच्या लागलीं,
आला माधव नाटकी कुठुनसा तों चोरट्या पावलीं
पाठीमागुनि येउनी हळु घरीं ठेवोनियां बासरी,
बोले, 'चावट ही, दिसे बघ गडे, मद्वेणु कुंभांतरीं !'

पुणें, १४ मार्च १९२५

# १३. आर्यकन्येचे डोहाळे

[ चालः—आजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला ]

छे नको गडे, थट्टा कसली करितां
डोहाळे कसले पुसतां ?
मज डोहाळे काय काय होतात ?
थांबाच सांगतें मात.
वाटतें मला काय काय तें वदतें,
हसुं नका हेंच विनवीतें.
( चाल ) मज वाटे गाणीं गावीं,
जीं धन्या माय जिजाई
प्रिय कुमार गाउनि निजवी !
मज वाटे कीं स्वयें यशोदा व्हावें,
भगवंत अंकिं खेळावे ! १
मज सुत व्हावा देशभक्त रणवीर
स्वातंत्र्यरणीं रणशूर !
परवशतेचा डाग पुसुनि काढील,
निज मातृभूमि हसवील !
स्वातंत्र्यसुधा पाजुनि दुबळीं हृदयें
करि कार्यक्षम जो सदये !
( चाल-) देशाची उज्वळ कीर्ती
दिग्दिगंतराला ने ती,
शौर्याची केवळ मूर्ती,
हत राष्ट्राला द्यावा त्यानें हात,
डोहाळे मज होतात ! २

सद्‌गुणशीला कन्या मजला व्हावी,
मूर्तिमती कवितादेवी !
सौंदर्य जिचें बघुनि नाचतिल रसिक,
पुरवील मनींचें कुतुक.
निज पावित्र्यें शोभवील कुलशील
भाग्यास राष्ट्र चढवील.
( चाल- ) दमयंती, सीता, तारा
तेजाच्या उज्वल तारा,
भूषविति देश जो प्यारा-
त्या देशाची भूषा कन्या व्हावी,
डोहाळे ऐका बाई ! ३
मज नको गडे, नकोच हिरवा शालू,
भलतेंच कशाला बोलूं ?
मी कुडिसाठीं नाहिं गडे रुसणार,
कधिं नाहिं हट्ट घेणार.
मज नावडतीं पनस, निंब, दाडिंबें,
नारिंगें, द्राक्षें, आंबे.
( चाल-) मज नकोच असलें कांहीं.
वासना न त्यावरि जाई,
परि तळमळतें मी बाई,
कीं विनवावें वापरण्याला खादी,
डोहाळे माझे नादी ! ४

विनविते सुता, देइं येवढें आई,
जगदंबे, अंबाबाई !
सौभाग्याचें अभंग राहो छत्र !
मम कंठीं मंगलसूत्र !
पतिसुतासुत प्रियजन तनुमनधनही
वेचावें देशापायीं !
(चाल-) मी हसेन प्रेमासाठीं !
मी रडेन दुबळ्यासाठीं !
मी मरेन देशासाठीं ।
सामर्थ्य मला देवो सीतामाई !
डोहाळे पुरवा बाई ! ५

पुणें, १६ आगष्ट १९२३.

# १४. नांव घे !

[ वृत्तः—वसन्ततिलका ]

घे, नांव घे, किति अतां करिसी बहाणा ?
घे छानसा परि बरोबरि त्या उखाणा !
गातेस गोड, मग ऐकिव तेंच रागें-
"छे ! नांव का कथियलें कधि कोणि रागें ?"

पुणें, २७ मे १९२६.

## १५. कृष्ण-प्रबोधन

[ चाल:—छांडो छांडोजी मोरे कनय्या ]

ऊठ यदुकुलतिलका, रे मुरारी, उशीर होइ भारी
अरुण देव आला ! धृ०
पूर्व रंगली, अपरा खुलली,
तशी अवनी नटली,
रंगिं रंगुनि गेली
रंगलाला ! ऊठ. १

बालकिरण हे चुम्बिती तुला
मीहि चुंबितें तुला
अरुणरक्तकपोला,
ऊठ लाला ! २

प्रेमचंद्रिका, भजकहंसिका,
तुझी छाया रसिका,
तीच-मधुर राधिका,
गोप बाला ! ३

पूजिण्या तुला पाहिं आणिलीं
तिनें सुमनें फुलली,
मनें तूंच जाहली
नन्दलाला ! ४

सवंगडी तुझी वाट पाहती,
कधीं येइ श्रीपती ?

कधीं गुंगवी मती
  मुरलिवाला ? ५

तिष्ठती हरी, यमुनातीरीं
तुझी मधुर बासरी
ऐकण्यास मुरहरी,
  गोपबाला ! ६

ऊठ सावळ्या, ऊठ गोवळ्या,
धेनु रानीं गेल्या,
जेविं भरवितें तुला
  दूधकाला ! ७

सावरीं भली कृष्ण काम्बळी,
तुझी यष्टि सावळी,
तुझी मूर्ति सावळी,
  गुंजमाला ! ८

दुष्ट मातले, ऊठ करिं दया,
हरी, संहरीं तयां,
व्रीद राखीं सदया,
  हरिं भयाला ! ९

सुप्रभात हा सुखकर सदया.
प्रभो, लागा कार्या,
जगा उद्धाराया,
  विश्वपाला ! १०

पुणें, १३ मार्च १९२३.

---

## १६. अंगाई गीत

[ चालः--आजि अङ्कुर हा ]

अयि गुणशीले, सुभगे, 'नलिनी' बाळे,
नीज गे नीज वेल्हाळे! ध्रु०
तुजसाठिं सये, किति‍क बोलिल्यें नवस
आजि अम्बा पुरवी आस!
दुहिता व्हावी मूर्ती सौंदर्याची,
ही इच्छा तव ताताची!
(चाल-) तूं इच्छा मूर्तिमती ती,
जगतास चेतना दे ती,
होउदे गुणांची ख्याती!
परि या गोष्टी अजुनि भाविकाळांत.
तोंवरी झोप घे शांत! १
हे दिवस तुझे पाळण्यांत हसण्याचे,
मम अंकिं स्वस्थ निजण्याचे.
चिन्ता कसली, राणी तूं सौख्याची,
पर्वा न आज जगताची!
(चाल-) भाविकाळ उज्वळ, व्हाया,
निज तेज जगा दावाया,
विश्रांति-काळिं सुखकर या,

ये नीज गडे, हालवितें मी झोला,
तूं प्रेमसुमांचा झेला ! २
मी माय तुझी, तुजला मी शिकवीन,
मी आर्या तुज बनवीन !
कर्तव्याचे कटुतर गिरवायाचे
आहेत धडे तुज साचे !
( चाल-) सामर्थ्य तसें तुज याया,
जगताची भूषा व्हाया,
घे शांत नीज या समया,
तुजसाठिं कवी गातिल मग नव कविता,
म्हणुनिया नीज गे आतां ! ३

पुणें, १४ डिसेंबर १९२३.

## १७. सारें खरें ! पण–

[ वृत्तः–शार्दूल-विक्रीडित ]

१

याहो, या पुढतीं विशंक, धरुनी धैर्या प्रयत्ना करा !
भाग्यश्री करिं माळ घेउनि उभी, तीतें चला या वरा !
मागें कां सरतां ? बघा नर कसे सद्भाग्यते पावले,
दैन्याच्या प्रखर स्थितींतुनि तयीं चोखाळिलीं पावलें !

२

हें सारें अगदीं खरें ! निपजतीं पद्में धुळीच्या मधें.
पद्में तीं फुलतील ! आज परि या पंकीं बुडालों पुरे.
आम्हीही पुढतीं असेच उदया येऊं, परी आज ही
दैन्याची स्थिति ना सुटे, प्रभु, अतां जाचांतुनी सोडवीं !

पुणें ४ जानेवारी १९२४

# १८. जादूगारीण

[ चालः-फटक्याची ]

निसर्ग देवी जादूगारिण करि जादूचा खेळ अहा !
कृष्ण कृष्णतर बुरखा घेऊनि दावि चमत्कृति भव्य पहा !
तुमचे जादूगार लपविती रूप आपुलें बुरख्यानें,
निजस्वरूपा प्रगट दाविते निसर्ग देवी बुरख्यानें !
वर आकाशीं तारांचा खच केला विधिनें कसा पण,
निशिं निशिं लोकां भारुनि टाकी, करुं आपण त्यावरि ताण !
अशा विचारें जादूगारिण फिरवी मग अपुली कांडी,
त्याली सृष्टी भीषण रूपा, झंझा तर ताण्डव मांडी !
एकामेकां धडक मारिती मेघ भयंकर कडाडुनी,
नर्दित विपना निनादवीते सुकल्या विश्वा नाचवुनी !
वाऱ्यावरचा नाच मनोहर मग विद्युत् मांडी अपुला,
नजर ठरेना गतीवर तिच्या पडेल केव्हां ही चपला !
शिलातलाच्या वा पंकाच्या आश्रयास दर्दुर बसला,
घसा फोडुनी आरडतो, जणुं साथ देतसे मेघांला !
नाचनाचुनी भान विसरले शिखी फोडिताती टाहो,
कंठ फुटे जणुं आज त्यांजला, भ्रांत विचारिति 'क्यां क्यांहो' ?
ताड ताड तड् वर्षति गारा, जणूं फटाके मोठाले,
निसर्गबाला शिलगावितसे दिवाळींतले उरलेले !

किंवा लागे स्वर्गधरेचें लग्न आज सुमुहूर्तानें,
मंगलाक्षता फेकिति द्विजगण भासतसे या जोरानें !
' शुभ मंगल ! सावधान ' म्हणती डरांव शब्दें दर्दुर हे,
धडाडधड् चौघडाच वाजवि मेग जणूं या स्तनितानें,
वर आकाशीं तारांचा खच, असितपटावरच्या चमक्या !
खालीं भूवर गारांचा खच, जणूं तारका गगनींच्या !
दसलाखाची मूठ झाकली जणुं सृष्टीनें उघडियली,
दिसे दिसे तों लुप्त जाहली, नजरबंदि दावी असली !
ध्वांत पळालें, विश्व उजळलें, तेज झळाळे चहूंकडे,
प्रकृतिरूपिणी गृहलक्ष्मी जणुं धुवुनि स्वच्छ करि घर अपुलें ?
मंजुल कलरव करिती द्विजगण, झाडें टवटवुनी हंसती,
फिरे समीरण झुलवित विश्वा, शेतकऱ्याची मजा किती !
अशी मजा क्षणभरी दावुनी तप्त सृष्टितें शांतविलें !
बुरखा फेकी जादूगारिण दिव्य रूप निज दडवियलें !

पुणें, १७ आक्टोबर १९२४.

---

# १९. गुढीचा पाडवा

[ वृत्तः-मंदाक्रांता ]

उत्साहानें नटुनिथटुनी पाडवा आज आला
आलापीत प्रभुवरयशा विश्वसंजीवनाला.
आनंदाचें नव उभविलें भव्य यानें निशाण
या या सारे झगडुनि यश मेळवा ! स्त्रैण व्हा न !
चित्सौख्याचीं उघळित फुलें दिव्य संदेश सांगे,
गेलें दैन्य, प्रचुर पुढती सौख्य या लागवेगें !
फुंका राख प्रगट करण्या आत्मतेजा त्वरेनें,
झाडा पानें गतरस जुनीं, पालवी ये नव्यानें !
दावो सौख्यें नित नवनवीं पाडवा हा तुम्हांला !
वर्षक्रांती चिरसुखद हो, मागणें हें प्रभूला !

पुणें ९ मार्च १९२५.

## २०. लाकूडतोड्या आणि सारंगी.

[ वृत्तः-शार्दूलविक्रीडित ]

मुंडासें-कसलें ? असेंच रगटें डोईवरी ठेविलें,
घामानें भिजलाहि चिंब सदरा तो फाटका खादिचा.
होता राकट वामहस्त विपुलस्कंधीं कुऱ्हाडीवरी
खालीं पाहुनि मार्ग आक्रमि जवें लाकूडतोड्या कुणी.
भिक्षा मागत वाजवीत अपुली सारंगि भिक्षेकरी.
मागें सूर धरीतसे मधुरवें लल्कारली बायको.
सारे तल्लिन होउनी जन तिथें होते उभे राहिले
तो माथां सविताहि गुंगुनि जरा होता उभा राहिला.
झाला मुग्ध, थिजे, स्वकार्य विसरे लाकूडतोड्या तसा
सुस्कारून परी क्षणांत वळला, उद्गारला अंतरीं.
'माझी बाइल आणि लाडकीं मुलें ! खायास नाहीं घरीं !
येड्यावाणिच राहिलों हत उभा ! सारंगिगऽथुत् तुला ! '
गानब्रम्ह पहा कसें जनमना साऱ्याच वेडें करी,
नाहीं भेद गरीब आणि धनवान् त्या मोहनाच्या घरीं !

मुंबई, ३० मे १९२५

———

# २१. मूक जीव

[ वृत्त:-मदांक्राता ]

ही देशाच्या तरुण पिढिची माय होणार बाला !
झालें मार्गेश्वरिं लगिनही, केवढा बोलवाला !
कन्याशाळेमधिं शिकत ती होति गेल्याच सालीं
तेव्हां आम्ही तिज परकरामाजि ना पाहियेली ? १
आतां साडी हिरवि, हिरव्या बांगड्या, पोत काळी,
रंगानें त्या नविन धुतल्या साडिच्या माखलेली
आतां हातीं दिसत न तिच्या बॅग ती पुस्तकांची
आतां हातीं परडि सुमनें आणण्या गौरिसाठीं. २
आया बाया म्हणति 'किति हो छान लाभे बबीला-
त्या सान्यांचें स्थळ लवकरी होउं द्या पुत्र तीला !'
डोळ्याच्या त्या कितितरि कडा खोल गेल्या मुलीच्या,
हातापायां बघुनि गमतें लेखण्या कीं बरूच्या ! ३
पूर्वी होतें विलसत मुखीं हास्य कीं चंद्रिकाच !
पूर्वी खेळे जणुं खळखळा वाहणारी नदीच !
तें खेळाडूपण हसितही विस्मरे आज पूर्ण
आतां तीतें गमत सहसा प्रौढ झालों म्हणून. ४
एवी सीडी वरुनि घसरे संस्कृतीच्या दरींत,
तीतें आतां क्षणभर नसे बोलण्याला उसंत.

कामाचा तो गिरि उपसतां जीव मत्यास येई
सासू रागे भरिल म्हणुनी घाबरी सर्वदा ही. ५

स्वातंत्र्याला मुकुनि झुरते आंतल्या आंत बाला
कोणी वाली तुजसि जगतीं नाहिं का मूक जीवा !
हाहा ! देवा कठिण दिन हे जाति केव्हां सरून ?
रूढीचे या कधि तटतटा पाश जाती तुटून ? ६

पाहा नेत्रें उघडुनि जरा आज सर्वंसहांनो !
निष्पापांनो, प्रियतम ! अशा हिन्दच्या कन्यकांनो !
हूं कीं चूं ना करुनि सतिंनो ! कष्ट जे सोशियेले,
बेपर्वा जे तुम्हि गिळियले अश्रु, ना दावियेले— ७

त्या कष्टांनीं अति करुण अन् मूक त्या हुंदक्यांनीं
केलें मोठें किति तरि पहा कार्य त्या आसवांनीं.
जागें केलें हलवुनि समाजास निद्रेमधून
आतां नेत्रें उघडुनि बघे, सर्व आलें कळून. ८

रुढीच्या त्या नख नरडिला पातला घावयाला
जैसा दुःशासन वध करूं इच्छिता भीम आला.
आतां आशारवि उगवला ! अंधकारा न थारा !
आतां अश्रू पुशिल तुमचे तो प्रभू तारणारा ! ९

पुणें, १ जानेवारी १९२६

---

## २२. मंजु-गान

[ चाल:— दीनवेष दीनेकरितां ]

अजुनि तान घुमते कानीं विश्व भारणारी
  सोड सोड पुनरपि बाले, दिव्य ती लकेरी ! धृ०
मंजुगान ऐकायाला जीव हा भुकेला,
नादतरंगांना सोडी अंबरीं विहारा,
  उडुगणांसही मोहवुनी येथ आणणारी ! १
दिव्यगान अधरीं तूझ्या प्रस्फुरे बघोनी,
मुग्ध कळी सौरभ उधळूं लागली बघोनी,
  प्राण एकवटले श्रवणीं ! अमृत ओतणारी ! २
रंग भराया जीवनिं या वाद्य लावियेलें,
साज सर्व सज्ज करोनी ठाण मांडियेलें,
  छेडणार तों हतदैवें छेदिलें जिव्हारीं ! ३
व्यर्थ व्यर्थ जीवनकलहीं काळ घालवीला
व्यर्थ सुखा शोधायाला जीव कष्टवीला,
  प्रीति-शान्ति-सौख्याची ना ऐकिली सतारी ! ४
प्रेमशून्य जीवन झालें, दग्धचित्त, हीन,
भारभूत झालों जगता काम्य राहिलें न,
  वाटलें न जगतीं आतां राहिली खुमारी ! ५
न्याहळून पाहियली त्यां एक एक तारा,

उदधितीरिं बसुनी सगळा उपसला ढिगारा,  
मधुरतर वसंतिं पिकांच्या ऐकिल्या लकेरी ! ६

गिरिशिरीं बसोनी सगळे किरण पारखीले,  
सप्तरंग इंद्रधनूचे एक एक केले,  
अंतरंग सृष्टिसतीचें शोधिलें कपारीं ! ७

नित्य नव्या सौंदर्यानें चित्त मुग्ध होई;  
खिन्नता परी नच सरली भावनाविदाही,  
श्रवणिं तोंच पडली तूझी गोडशी लकेरी ! ८

आणि–अहा ! सौंदर्याचें द्वार खुलें झालें !  
आजवरी शोधियलें जें तेंच करीं आलें !  
लुप्त करुनि नैराश्यतमा, चित्त उजळणारी ! ९

ऐकतांच दिव्य लकेरी खिन्नता निमाली,  
वस्तुजातिच्या सौंदर्यीं नव्य रुची आली,  
पारिजात सुमनांची ही वृष्टि, ना लकेरी ! १०

ऐकुंदे बनूंदे वेडा नादलुब्ध साचा,  
ऐकुंदे बनूंदे बंदा दिव्य लकेरीचा,  
ऐकतांच विसरुनि लज्जा ओढुंदे मला री ! ११

मंजु-गान अधरांतुनि त्या सारखें झरूंदे,  
आणि हृदींची काव्याची तार थरारूं दे,  
थांबतांच विरुनी जावो देह नी लकेरी ! १२

वसई, २० सप्टेंबर १९२६

## २३. अभागिनीचें गाणें

[ चालः--भगवती, नवस तव चरणीं ]

कां करिसि अशी बळजोरी ?
दावुनियां सत्प्रीती
कां करिसि अशी बळजोरी ? ध्रु०

सख्या, तुझ्यास्तव वणवण फिरलें,
गणगोतांना ना जुमानिलें,
तुजाविण उदास फिरलें निराश,
अजि आलें तुझिया दारीं ! १

वृक्षलतांना, जडपाषाणा
विचारिला तव ठावठिकाणा,
कुणि मज पुसे न, कुणि माशीं वदे न,
किति शिणलें कुणि न विचारी ! २

काय करावें, कांहिं सुचेना,
चित्त लोभलें तुझ्या पदांना;
कितिदां मनास वदलें, जिवास
दे जाउनि कृष्णातीरीं ! ' ३

इतर विषयिं मन रमे न कसल्या
इतर विषय नच तुजविण कसला !
तुजविण सुखेंहि विषसम विदाहि
दुःखांना हाका मारीं ! ४

तुझ्याविणें सुखभोग भोगणें,
जळो जिणें तें लाजिरवाणें !
विपदा भयदा तुजविण सुखदा,
योगिनी सुखाला विटलें ! ५

तुझी संगती, सुखसीमा ती !
दुःखें? कसलीं ? नुसती भ्रांती !
तुजसह सुखेंच मिळतिल सदाच
तव संगति दुःख निवारी ! ६

किती वत्सरें अशीं लोटलीं,
आशा परि नच कधिही मेली !
कधि तरी बघेन, तव पदिं रमेन,
मज अमर तुझें नाम करी ! ७

पाहिन तुजला डोळे भरुनी,
मूर्ति साठविन अंतःकरणीं !
मृदुवच वदेन, तुजसह हसेन
दृढ आलिंगिन तुजलागीं ! ८

जनापवादा तिरस्कारिलें,
मनलज्जेला पुरुनि टाकिलें,
तूं ! तुजविणें न कुणास बघेन,
मज नको जगाची थोरी ! ९

किती दुर्वचें, किती संकटें
सोसुनि आलें तुडवुनि काटे

ग्रा. क्र. ३८८८



बघ तरि मुरडुनि नयनें उघडुनि
कां फिरविसि मुख माघारीं ? १०

दुःखाच्या भीतिनें तुझ्यावरि
प्रीति दाविली असेल कधिं जरि,
शिरिं मम शतधा पडोत विपदा
मत्प्रीति अशी ना दुबळी ! ११

सुखलाभाच्या आशेनें जरि
प्रीति दाविली असेल तुजवरि,
तव पद मिळून सुख मुळिं मिळो न
सत्प्रीति कधीं सुखलोभी ! १२

सौंदर्याच्या स्वर्गि रमावें,
सुखदु:खांना विसरुनि गावें ?
भक्ति तुझ्यावरि सात्त्विक हो जरि
त्वद्रूप मला होऊं दे ! १३

नको लोटुं दुरि जवळी आलें,
मागें बघतां दृष्टि फिरे रे !
तुजविण भकास संसृति कशास ?
चल मोक्ष देइं तूं स्वकरें ! १४

लोटिलीस जरि अनाथ अबला
जाऊं कुठें मी ? मज सांग भला.
तव पद धरीन, मुळिं नच त्यजीन
पदिं तुझ्या विरुनि जाइन रे ! १५

हृदयीं सरस्वति, पदिं गंगा तव !
मन्नेत्रांतुनि यमुनेचा स्रव !
फिरविसि कशास प्रवाह उगाच ?
हा संगम किति सुखकारी ! १६

दासी तव, मज पदीं राहूं दे !
नामीं तव मज सदा गुंगुं दे !
जनमत भलतें, उरिं नच सलतें !
प्रीत का अशास विचारी ? १७

पुणें, १२ मार्च १९२६

---

# २४. त्याच तारेस !

[ गझल ]

ती रम्य कांति मुखावरी नव चंपकासम शोभते,
ते एक दोनच शोभती बघ केशगुच्छ मुखावरी.
दाणेच डाळिंबांतले रदनावली शोभे तशी,
खेळे छबी गालांवरी नव पल्लवीं नवती जशी !
लव हासतां नयनामधीं सद्भावतेज चकाकलें.
दृष्टी भिडे मम जेधवां तूं लाजलीस कळी जशी !
स्मित रम्य शांत करीत चंचल वृत्ति माझ्या तारके,
ती दृष्टि चंचल मूढ या हृदिं शांतता प्रस्थापिते.
पुष्पांमधील सुगंध तूं, तारल्य तूं तारांतलें !
उन्मादकारि लकेर तूं गानांतली गे प्रेमळे,
औत्सुक तूं हृदयांतलें, चित्तांतली विमनस्कता,
प्रतिभाच उज्वल शारदे, राणीच तूं, तूं देवता !
शब्दांतला गूढार्थ तूं, काव्यांतली रमणीयता !
हृदिं साठलेलें काव्य तूं, मम कल्पनेची स्वैरता !
बसलीस तूं माझ्यापुढें जशि तारका चंद्रपुढें ,
मकरध्वजा, मनमोहना, आजि शोभतां दासापुढें !
सरसाविसी वरचेवरी ते केस गालीं खेळती,
सरसावितां बघसी हळूच करांगुलीमधुनी मसी

ती चोरटी कृति हेर माझे नेत्र गे जधिं हेरिती
चट्कन् कर स्खलला तुझा अन् रंगलें मुख तें किती ?
मुरडूनियां मुख खालती, वळवून दृष्टिहि खालती
हातांतल्या डावाकडे मग्न पाहसी, किती मौज ती !
'भलतेंच तारे खेळसी, कोणाकडे तूं पाहसी ?'
कुणि बोलतां कोपें वृथा मन आवरीतच बोलसी:
'चल, इश्श ! हें रे काय दादा, बोलसी भलतें गडे !'
मी हासलों, तूं खेळतां हसलीस पाहुनियां पुढें !
'किति वाजले?' ठावें कुणा ? रमलीं मनें, भ्रमली मती.
'तारे, दिनू, जेवायचें नाहींच का ? या खालती.'
चमकून तूं उठलीस लाजुनि सज्ज झालिस जावया,
'तारे, घरीं चल.' तेवढ्यांतच नेत्रमीलन जाहलें !
गेलीस झट्कन् सावरीतच केस अन् वृत्ती जरा,
बुचडा करें करिसी बरा सरसावुनी बटमोगरा.
गेलीस तूं, नेलेंस तूं मज ओढुनी अपुल्यासवें !
मी चाललों तुज सोडुनी, कधिं भेटशील पुन्हां सये ?
तव रूपदर्शनलालसा भुलवी मना, वेडें करी,
बेहेस्त सर्वहि तुच्छ गे तुजवीण हे गुणसुंदरी !
ताराच तूं स्वर्गांतली ! उल्का निघें मी खालती.
धूळीमधून तरी मला वधुंदे तुझी रुचिराकृती !

अहमदनगर ३० आक्टोबर १९२३.

———

# २५. तूं आहेस तिथें—

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

तूं नाहींस तिथें फुलोत कमळें, तीं तुच्छ सारीं मला !
तूं नाहींस तिथें हसेल कमला, हासेन मीही तिला !
तूं नाहींस जरी तरी प्रियतमे, व्हावें कशाला जग ?
स्वर्गाचें अधिराज्य? धिक् तुजविणें ! धिग् जीविताची धग !
प्रीतीचा फुलबाग हा बहरला, व्हावें कशा नंदन ?
हास्याचीं मधुरे, फुलें उघाळिशी, तो तुच्छ तारागण !
ओठांतून वहातसे सुरनदी तूझ्या सुधावाहिनी,
तीथें धुंडित कां तरी वणवणा हिंडूं अगे मोहिनी !
चंद्रार्कासह तारका प्रभु जरी अर्पी मला प्रीतिनें,
'दे आणीक' म्हणेन त्यास, हवरा, होई न तृष्णा कमी.
तूझा लाभ जरी घडेल सहसा तारे, जगन्मोहने !
पृथ्वीच्या कुठल्याहि तुच्छ कुहरीं राहीन सौख्यांत मी !
तूं आहेस तिथें प्रभू वरुनियां ओतील सौख्यें नवीं !
तूं आहेस तिथें हसेल कमला ! गाईल काव्यें कवी !

पुणें, २८ एप्रील १९२४

———

# २६. स्वर्गीय संगीत

[ चाल:—उघडिं नयनरम्य उषा हसत हसत ]

गाच गडे, पुनरपि तें गोड तुझें गाणें !
तप्त हृदय शांत करीं त्या सुधारसानें ! ध्रु०
सोड एक तव लकेर
विश्व करीं शांत, स्थिर
डोलूं दे रसिकजनां । गान मोहिनीनें ! १
सायंतनिं रम्य अशा
लोल तारका जैशा
पटपट उगवति तैशा । सोड तव लकेरी ! २
भर सारें नभ त्यांनीं
त्रिभुवन बुडुं दे गानीं
प्रेममये, प्रेम भरुनि । जगतिं वाहुं देई ! ३
आळवुनी भूपराग
मत्तभूप करिं सराग;
सम्राज्ञी जगताची । तूंच एक बाले ! ४
चंद्रिकेंत न्हाऊं दे,
भान मला विसरूं दे,
गुंगूं दे, झिंगूं दे । अमृतपानिं बाल ! ५
विसरूं दे मज क्षणभर
असह्य असा दुःखभार
ऐकुनि तव मधु लकेर । तप लया जाई ! ६

घोर तिमिरमय रजनी,
घोर तिमिर मनिं साजणि,
गानतेज पसरोनी । उजळविं क्षण त्यांतें ! ७
वासन्तिक कोयळ तूं,
करिं मदीय पूर्ण हेतु,
न धरीं मनिं लव किंतु । गाइं मन भरोनी ! ८
भारुनि टाकीं धरणी
त्या त्वदीय मंजु गानिं,
गानसुधा सिंचोनी । अमर करिं जगातें ! ९
नाद लहरिवरि बसुनी
जाऊं दे सुटुनि इथुनि
मर्त्यलोक पापखनी । पार होऊं दे गे ! १०
कां वा हा अट्टहास ?
नादें तव पापनाश
होइल भू स्वर्ग खास । गाइं म्हणुनि बाले ! ११
नीलनील नभपटलीं
कृष्णकृष्ण मेघजालिं
चमकत तेजा उधळी । तारकातती ही ! १२
नादरथीं बसुनि गडे,
वागडेन चोहिकडे,
उडुगण झेलीन खडे । उधळिन जगतीं ते ! १३
चन्द्रमण्डला वरती
जाइन मी सहज अती
ओतिन अमृता अरतीं । लीलया सखे गे ! १४

नादरसीं न्हावोनी
प्रभुपदिं जाईन तिथुनि
स्वर्गंगेते बघुनी । धिक्कारिन तीतें ! १५

नन्दनिचा मधु-सौरभ
केवळ जो अमर-सुलभ,
मर्त्यजनां देइ लाभ । तोच तुझ्या गानें ! १६

तो रव यमुनातटिंचा,
माधवीय मुरलींचा,
राधेच्या ओळखिचा । तोच ऐकवीं गे ! १७

स्वर्भू-संगम घडवीं,
आत्मा अमृतीं जडवीं,
तेजें विश्वा नटवीं । गाउनियां गाणें ! १८

गा पुनरपि ऐकूं दे,
ऐकत मज झोपूं दे,
झोपेमधिं ऐकूं दे । दिव्य तेंच गाणें ! १९

मंजु गान तव ऐकुनि
जातिल विश्वें विरुनी,
शून्यांतच शून्य बनुनि । ऐकिन तें गाणें ! २०

प्रीतीचा मी भिकारि
आलों तुझिया दारीं,
गान देवते, श्रम हारिं । ऐकवुनी गाणें ! २१

वसई, ७ एप्रील १९२७

---

# २७. गोड वेड

—:o:—

[ चालः—तो एकच प्यारा बोल ]

तूं कमला कमलोपमा । सुखाची कमा
तुझ्या सहवासीं
तुजवीण सखे, परदेशी ! १

मी तुझ्या लागलों नादिं । खुशीनें अगदिं
कुणा ना पुशिलें
जन म्हणती अनहित केलें ! २

चिमणिचें पोर मी खरें । कां तुवां करें
स्पर्शिलें मजला ?
गणगोत पारखा झाला ! ३

घे आतां उचलुनि करीं । ठेव पंजरीं
तुझ्या हृदयींच्या
बागडेन तेथें साचा ! ४

जिव झाला सखि, घाबरा । कोण आसरा ?
कोण पुसणार
नयनींची गळती धार ? ५

धडधडे हृदय बापुडें । मनीं मन कुढें
तुझ्यावाचून
ओसाड लोकही तीन ! ६

तुजविणें वृथा संसार । जीवनाधार

कोण जगतीं
तीरिंची असह्य तळमळ ती! ७
कोळपून गेला जीव । सुधा पाजीव
तुझ्या अधरींची
त्यजि आस नातरी याची ! ८
घडिघडी तुझी सय होय । कीं जशी माय
आठवे बाळा
जिव तसा घाबरा झाला ! ९
वरिवरी हासतों जरी । तरी अंतरीं
पेटला वणवा !
प्रभु ! प्रेमाश्रूंनीं विझवा ! १०
हें तुझ्या प्रीतिचें रत्न । मिळविलें यत्न
करुनि बहुसाल,
देऊन जिवाचें मोल ! ११
प्रळयिंचा वात जरी सुटे । तरि न मन विटे
तुझ्या प्रीतीला,
मी हसेन जनरीतीला! १२
कडकडो वरुनि आकाश । दुभंगुनि नाश
करूं दे धरणी
तरि राहिन तुझिया चरणीं ! १३
तव हास्याच्या प्रतिभेंत । रचिन अभिजात
काव्य नवसृष्टी,
गाधिजही होइल कष्टी ! १४
प्रीतिचा उदधि मंथीन । जगीं उधळीन

काव्य रत्नांना,
आनंद सुरां असुरांना ! १५
प्रीतिची मूर्त देवता । माउली स्वतां
तूंच बनलीस,
मातेसहि विसरविलेंस । १६
तव गरिमा वर्णूं किती । सखे, जडमती,
मतिहि मम चळली,
तव रूपीं समरस झाली ! १७
प्रीतीची प्यालों भांग । म्हणुनि निस्संग
असा बडबडतों,
बरळुनी जिवा रमवीतों ! १८
जन म्हणती वेडा पिसा । भके दीनसा
दिवसरातीं.
या मधेंच याला मुक्ती ! १९
या वेडांतच राहुं दे । आणि बरळुं दे
तुझी गुणकीर्ती,
जी रमविल जगता अंतीं ! २०

जत, ८ नोव्हेंबर १९२६

# २८. चान्दबिबीचें पुण्यस्मरण

( सन १५८५ त अहमदनगरच्या गादीविषयीं तंटे चालू होते. चांदबिबि जातीनें कारभार पाहात असे. ही संधि साधून अकबरानें आपला मुलगा मुराद यास त्या राज्यावर स्वारी करण्यास पाठविलें. चांदबिबीनें स्वतः युद्ध करून हल्ला परतविला. मध्यंतरीं चांदबिबीचा खून झाल्यामुळें अहमदनगरचा किल्ला मोगलांचे ताब्यांत गेला. रातोरात बांधून काढविलेला तो एका अबलेच्या धैर्याचा तट पाहून कोणाच्या मनांत खालील विचार येणार नाहींत ! )

[ चालः––आनंदकंद ऐसा हा हिंद देश ]

राणी अदिल्शहाची येथें लढोनि मेली ! ध्रु०

तारा तिच्या यशाचा अस्मानिं डोल देई
थर्कन् वदे जगाला–राणी लढोनि मेली १

घन कृष्ण भीति दावी चमके तयांत बिजली,
बोले हसून बोली-राणी लढोनि मेली ! २

काळेकभिन्न फत्तर थरकापवून देती
ग्वाही तिच्या यशाची–राणी लढोनि मेली ! ३

ती दृष्टि दीनवाणी मृगबालका, पुरे रे,
'कयांहू' घुरे मयूरा, कळलें, लढोनि मेली ! ४

विश्वास मोह घाली सौन्दर्य ज्या सतीचें
राणी विजय्पुरीची येथें लढोनि मेली ! ५

सौन्दर्य–तारकांची राणीच चंद्रिका ती
ती चांदबी स्वराज्या-साठीं लढोनि मेली ! ६

तो विश्ववंद्य सम्राट अक्बर पिता जयाचा,
पदधूलि झाडि जेथें तेथें लढोनि मेली ! ७
ज्या हातिं कंकणांचा रुमूझुम् निनाद यावा,
तो हात खण्खणावी सशोर वीर्यशाली ! ८
हुजुरात मोगलांची चौगीर्द वेढलेली,
तल्वार ती जनानी चमके नभांत बिजली ! ९
तट फोडिला रिपूनें खिंडार भीति दावी,
ती शौर्यधैर्यशाली नाहीं परंतु भ्याली ! १०
करिं खड्ग नाचवीते, विरांस चेतवीते,
रणदेवता करारी हट्टास पेटलेली ! ११
काळ्या तशाच रातीं तट बांधवून काढी,
चातुर्य-धैर्य-शौर्या जगिं गाजवून गेली ! १२
देशांत आपुल्या या दुहि घालि नाच नंगा
म्हणुनीच घातक्यांची सुरि शुद्धरक्त प्याली ! १३
मी भक्त भावनांचा विसरूं कसा सतीला ?
स्मरणेंहि होइ जीच्या इतिहास भाग्यशाली ! १४
रसिका ! चला बघाया, तट आज साक्ष देई:
राणी अदिल्शहाची येथें लढोनि मेली ! १५

अहमदनगर, २१ आक्टोबर १९२३

-----

## २९. श्री समर्थ-स्मरण

[ वृत्त—ओवी ]

समर्थांची दिव्य मूर्ती । जी विश्वांतरीं भरे स्फूर्ती
आठव आठव आर्या, चित्तीं । संस्थान तें !

समर्थांची विवेकवाणी । पुन्हां भारता, ऐक श्रवणीं
बोलिलिया ऐशी करणी । करूनि दावीं.

समर्थांचा विश्वसंचार । समर्थांचा विश्वसंसार
समर्थांचा लौकिकाचार । आचरूनि दावी.

समर्थांचा मनोनिग्रह । राष्ट्रभक्तीचा गंगाप्रवाह
समर्थांचा लोकसंग्रह । ध्यानीं आणीं.

समर्थांचा दासबोध । प्रपंच परमार्थ करी विशद
मोतीमोल एक एक शब्द । कंठी ठेवीं

श्रेष्ठीं जें जें आचरिलें । तें तें जगता प्रमाण जाहलें
म्हणोनि विचारूनि केलें । कांहीं पाहिजे !

पुणें, १७ एप्रिल १९२५

---

# ३०. तुझा तिळगूळ

[चालः—आजि अक्रुर हा]

तिळगूळ तुवां प्रेमें जो धाडियला
पोंचला सखे, वेळेला.
तिळगूळ परी देऊं तुज मी कसला ?
कोठला, कसा नि कशाला !
एकाकी तुजविण झुरतों,
तळमळतों, कुढतों, रडतों,
हतदैवा दोषहि देतों,
मी कंठितसें काळ असा एकांतीं
कोठली जिवाला शांती ? १
या हृदयाच्या पार चिंधड्या झाल्या,
त्या दैवा अर्पण केल्या.
ही धगधगती पेटे अंतरिं होळी,
भावनासुमां जी जाळी !
परि गंध अजुनि दरवळतो,
मृत हृदया जागृत करितो,
डिवचुनी वृथा शिणवीतो !
हा जाच कधीं संपविशिल परमेशा ?
पदिं नेई, पुरली आशा ! २

त्या धगधगत्या होळीवरतीं कढई
ठेविली मनाची बाई !
या रक्ताचा पाक बनविला छान,
बघ तार तया सुटली न ?
तिळतीळ हृदय जें तुटलें
तुजसाठीं अजवरि बाळे,
ते तीळ जमविले सगळे,
घोळुनी तयां हलवा केला आज
अर्पितों, कशाची लाज ? ३
उरिं बाळगिल्या आशांची करिं राख
तरि गोड वदूं बिनधोक !
मी भाइ तुझा, ताई तूं, हें नातें
शिकविलें तूंच ना मातें ?
जा विसरुनि लटकी माया,
लागतों तुझ्या मी पायां,
आठवीं मनीं यदुराया,
कधि तरी सये, तोच जगाचा ईश
पुरवील मनींची आस ! ४

वसई, १४ जानेवारी १९२७

---

# ३१. स्वारस्य आहे भवीं !

[ वृत्तः—शार्दूलविक्रिडित ]

येथें तूं बसलीस हा प्रियकरे ! होतीस येथें उभी,
येथें बैसुनि एकजीव बनुनी गोष्टी किती बोललों !
येथें तूं म्हटलेंस हासुनि कधीं, 'वेडा कसा तूं असा ?'
येथें बैसुनि ढाळिलीं कितीतरी तूं आणि मी आसवें ! १
पूर्वीच्या स्मृतिनीं अहा मधुरशा आनन्द कां वाटला ?
ध्यानीं येउनि वर्तमान अमुचीं भांबावलीं कां मनें ?
बुध्या विस्मरुनी कठोर असल्या कां वर्तमानासही–
काळाच्या पडद्यापल्याड लपल्या आशेकडे पाहिलें ? २
हा हा ! तें सगळें तिथेंच उरलें, गेलीस तूं टाकुनी;
कर्तव्यास्तव मीहि सोडुनि तुला येथें असा कष्टतों,
तूं तेथें जरि, मीहि येथ, तरिही आहेत संगें स्मृति,
त्यायोगें अजुनी गमें लवतरी स्वारस्य आहे भवीं ! ३

वसई, १३ जून १९२६

## ३२. अन्त किती बघसी !

[चाल:—अजुनि किती निजसी सुंदरा,]

अन्त किती बघसी । राजसे,
अंत किती बघसी ?
या ताना ऐकुनि मम गीताच्या कां न अजुनि येसी ?
तव चिंतनिं गेली । राजसे,
तव चिंतनिं गेली
ती श्यामा रजनी कशी बशी सखि, निद्रा !-छे कुठली !
कींव न ये तुजसी । अजुनि कां
कींव न ये तुजसी ?
तुजसाठिं तोडुनी पाश सर्वही फिरतों वनवासी !
तव दर्शन दुर्लभ हतभाग्या मज झालें;
म्हणुनीच दर्शना उतावीळ मन झालें;
कां न अजुनि येसी ! सांग मग
कां न अजुनि येसी ?
बघ उषादर्शना अरुण पातला मिरवित तेजासी ! १
ऊठ अरुण आला । राजसे,
ऊठ अरुण आला !
स्वर्गाचीं दारें हळूच उघडुनि पाहि उषा त्याला !

एक एक तारा । लोपते
एक एक तारा,
जणुं दुःखि-जनाच्या मनोरथाची तुटते ही माला !
ही उजळे प्राची आली तुज भेटाया,
हा मन्द समीरण झुलवित पानें आला,
करीं स्वागतातें । त्यांचिया
करीं स्वागतातें
ये, ऊठ, पहा ही कोयळ आळवि पंचमरावें तूंते ! २
प्रेमगान चित्तीं । तुम्बलें
प्रेमगान चित्तीं,
तें तेंच गात हे विहंगम सखे, व्योमपथें जाती !
द्वारें उघडोनी । राजसे,
द्वारें उघडोनी
ये बाहिर, केलीं मद्हृदयाचीं दारें मीं उघडीं !
तूं सुमुहूर्तीं या अशा प्रवेशा करीं,
ही मंगल वेला प्रभातची सुन्दरी !
ये ये ये, घडि ही । चालली
ये ये ये घडि ही,
तूं उघडुनि डोळे एकवार मज झुरतांना पाहीं ! ३
किती तरी झुरणें । तुझ्यास्तव
किती तरी झुरणें ?
मज याहुनि वाटे बरें नाम तव गात गात मरणें !

एकदांच जाळी । चिता ती
एकदांच जाळी
परि विरहानळ हा चित्ताची नित पेटवितो होळी !
दिननिशीं तुला मी आळवितों राजसे,
स्मरणाविण तूझ्या घडि नच मुळिं जातसे !
काय दुस्थिती ही । पाहवें ?
काय दुस्थिती ही ?
नवनीत-हृदयकोमले, निर्घृणा जाहलीस केवी ? ४
हृदयाची स्वामिनी । राजसे,
हृदयाची स्वामिनी
तूं तूंच एकली ! नाहीं मजला ठावा दुसरा धनी !
गाजविण्या सत्ता । ऊठ ये
गाजविण्या सत्ता,
चल तोडुनि सगळीं खुळीं बंधनें दावूं ये जगता !
तूं नयनशरांनीं विद्ध करीं गे मला,
वाहवीं अशुद्धहि हृदयांतुनि खळखळा,
पाहशील तिथुनी । राजसे,
पाहशील तिथुनी
बिन्दूबिन्दू झरतांना तव नाम मधुर घेउनी ! ५
मुक्ति सये तूंच । राजसे,
मुक्ति सये तूंच,

---

१ रक्त.

तुजविणें कशाला हवा मोक्ष मज ? बन्दिवास तोच !
बंदित मुक्तीच्या । राहुं दे
बंदित मुक्तीच्या
मी कधीं न वांछिन तिथुनि सुटाया, सत्य सत्य वाचा !
मी भक्त तुझा गे, देवताच तूं माझी,
करिं पूर्ण कामना प्रिय तव या दासाची !
अन्त किती बघसी । राजसे !
अन्त किती बघसी !
या ताना ऐकुनि मम गीताच्या कां न अजुनि येसी ? ६

पुणें, २८ आगस्ट १९२५.

---

# ३३. परडींतील फुलें

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

होता चंद्र अजून दावित मुखा निस्तेज एकीकडे,
पूर्वा स्वप्रियदर्शनांत रमली रक्तांशुकें नेसुनी !
होती त्या सुषमेंत लोपत हळू एकेक तारावली;
वाटे आंगणिं स्वर्गिंच्या मधु उषा पुष्पेंच ही वेचिते !
होता वात वहात, फेकित सुमें नाचे जणों स्वैर हा,
जादू ती जणुं निद्रित स्थिरचरा स्पर्शून जागें करी !
उत्साहप्रद, शान्त, मुग्ध समयीं मुग्धा कुणी बालिका
पुष्पांहीं भरली करांत परडी घेवोनियां चालली !
प्राचीची जणुं कन्यका, सुवसना, सौन्दर्य-लीलावती;
पाहोनी तिजला स्वयेंहि बनलों मी मुग्ध, अन् बोललोंः
फेकीं चार सुमें सये, मजकडे त्यांतून हुंगोनियां,
माझ्या शान्तवितील तप्त हृदया बोलून एक क्षण !
राहूं दे, परि थांब, दिव्य सुमनें फेकूं नको देवते !
फेकूं दे हृदयाब्ज त्यांत अपुलें ! नेशील ना त्यासवें ?

पुणें, आक्टोबर १९२७.

# ३४. तूंते कळावें कसें ?

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

तूं मी होउनि एकरूप जगता पालाण घालूं झणीं !
गानानें अपुल्या विमोहुनि धरा, तारांसही हासवूं !
प्रीतीचेच धडे जगास शिकवूं ! प्रेमामृता पाजवूं-
देवांनाहि ! करूं जनांस दुबळ्या स्वर्लोकवासक्षम !
तूं माझीच धनीण मी समजलों, तूझाच मी सारथी
या गुंगींतच मी मनोरथ जवें हाकारिला हा पुढें
देखोनी रथ रिक्त आज कळलें, नाहींस माझ्यास्तव !
जा, कोठेंहि सुखी रहा सुरुचिरे ! दुर्दैव माझें अतां !
आशा त्या विफला, मनोरथ घुणा लागोनियां भंगला,
तूं गेलीस मला त्यजून सहसा दावानलीं सारसा !
दृष्टी व्याकुळ होय, चित्त थिजलें, ही आग चोहीकडे !
देवा ! सोडिव ! मी जिवंत जळतों ! छे--सोसवेना अतां !
नामाची तव अक्षमाळ धरुनी कंठांत या राजसे,
मी वेड्यापरि एकला भटकतों ! तूंते कळावें कसें ?

पुणें, ७ आगष्ट १९२४.

# ३५. हिन्दु-संघटन

[ गज़ल ]

काळिमा धर्मांस अन् राष्ट्रास येई ज्यामुळें
ऐक्य सारें नासलें,
मृत्युपंथा लागला हा धर्म भाई ! ज्यामुळें,
हीनतेनें ग्रासिलें,
जातिभेदाची पताका वागवीतां कां करीं ?
आत्मविश्वासा हरी.
शत्रुला जाणा, घरीं घ्या बंधुंना आतां तरी,
आठवा चित्तीं हरी !
बेफिकीरी, बेभरोसा, बेहरामी माजली
काय बाकी राहिली ?
कोणि ना कोणा पुसे, धुंदींत सारीं धुन्दलीं,
भांडुनीया भ्रष्टलीं.
येउनी कोणीहि येथें सौख्य भोगावें, परी
दैन्य ये आम्हा करीं !
बंधुला बन्धू उठे खायास नाहीं भाकरी,
ये भिकेची चाकरी !
जातिच्या पोत्यांत का कर्तृत्व सारें साठलें ?
तत्व ऐसें कोठलें ?

पौरुषाची का मिराशी श्रेष्ठ जातींना मिळे ?
तत्व टाका हें खुळें !
दैवयोगें श्रेष्ठता ना येतसे कोणा कधीं !
भेद सोडा, व्हा सुधी !
दारिचे हेराल दुष्मन् ऐक्य जोडोनी जधीं,
उन्नती होई तधीं !
दृष्टि द्या थोडी तरी पृथ्वींतल्या धर्मांकडे,
वाजवीती चौघडे;
' या गड्यांनो ! सोडुनी या आमुच्या धर्माकडे,
हिन्दुधर्माचें मढें ! '
घोष ऐका ! कां अजूनी घोरतां ? हो घेरिलें
शत्रुनें आतां पुरें.
थांबवा बेबन्दशाही ! वाचवा हीं कोकरें,
हिन्दभूचीं लेकरें !
क्रान्तिलागीं सज्ज व्हा ! हिन्दूंस सार्‍या मेळवा !
काळ ना हो घालवा !
स्पृश्य हा, अस्पृश्य हा, हा भेद सोडा, एक व्हा !
स्वाभिमाना जागवा !
श्रेष्ठतेच्या त्या फुकाच्या कां बढाया सांगतां ?
कां फुकाचे कष्टतां ?
धिग् जिणें ! स्वातंत्र्य ना ! सत्ता कुणाला दावितां ?
कां स्वकीयां दापितां ?

मायभूच्या पल्लवाला आग लागे देखतां,
पाहतां अन् घोरतां !
काय ही स्वातंत्र्य-भक्ती ? श्रेष्ठता कीं हीनता ?
वेड सोडा हें अतां !
घ्या करीं समशेर जंगी कर्मयोगाची भली
ऐक्यभंगें गंजली,
मर्दुमीची संधि साधा दैवयोगें लाभली,
आत्मतेजें व्हा बळी !
एक व्हा ! घ्या हात हातीं बंधुचे ! कां लाजतां ?
स्पृश्य सारे जाणतां !
बंधुंना जी दूर सारी ती खरी अस्पृश्यता !
तत्व हें पाळा अतां !
अन्य धर्मांची चढाई आपुल्या धर्मावरी
ओळखोनी अन्तरीं,
काय तें आतां करा ! द्या सोडुनी आतां तरी
मत्सराची चाकरी !

वसई, १५ जुलई १९२६.

---

## ३६. रोकडा सवाल

[ वृत्तः—वारुणी ]

हिंदु ना तूं हिन्दवासी ? बोल भाई, बोल भाई !
रोकडा दे जाब, ठेवीं मागती ना बोल कांहीं ! ध्रु.
धर्म जो तूझ्या पित्याचा, धर्म तूझ्या पूर्वजांचा,
तोच हिन्दूधर्म तूझा होय ना ? रे बोल भाई !
राक्षसांना मर्दिलें ज्या कारणें श्री रामचंद्रें,
राघवाचा, जानकीचा, तोच ना त्वद्धर्म भाई ?
बंध-गीताघोषणा केली जयासाठीं प्रभूनें,
श्रीहरीचा, तोच तूझा धर्म ना रे बोल भाई !
शंकराचार्यें जयाच्या रक्षणीं होमून काया
वाचवीला, तोच हिंदूधर्म ना तूझाहि पाहीं ?
मान्य जो विश्वांतरीं या श्री शिवाजी भूप गाजी,
पालिता जो गोद्विजांचा, धर्म त्याचा तो तुझाही !
कापुनी गर्दन् अरींची वाचवीला धर्मबंधूं
वीर बाजी-बोल त्याचा धर्म नाहीं का तुझाही ?
ज्याचिया संरक्षणीं झाला हुतात्मा तो महात्मा
मृत्युनें ज्याच्या झुरे तो धर्म तूझा काय नाहीं ?
बोल भाई ! बोल भाई ! कां उगा ? कां मूक वाचा ?

---

१ छत्रसाल. २ स्वामी श्रद्धानन्द.

कां उसासे टाकिसी? ते व्यर्थ! शोभे का ढिलाई?
धर्म तूझा, देश तूझा, रक्षणीं त्यांच्या मराया
कां न होसी सिद्ध? वीरें कां रडावें धाइधाई?
ग्लानि ये धर्मास जेव्हां, श्रीहरी घेईल जन्मा,
येउनी रक्षील तो, का पाहसी बा वाट तूं ही!
सारथी होईल का तो आळशांचा चक्रपाणी?
पूस जा त्या अर्जुनाला, बोध घेई आज कांहीं!
श्रीहरी येईल तेव्हां येउं दे ना येउं दे वा
काय तूं जोडून हस्तां लोटिसी धर्मास डोहीं?
'श्रेष्ठ मी, हो दूर तूं चाण्डाळ!' बंधूला वदावें,
'आइये बैठो यहां जी!' हें कुणाला? रीत का ही?
आपुले ते घालवीले, मानुनी बंधूंस वैरी
दूरच्यांनीं घात केला दावुनी विश्वास भाई!
मेळवीं एकत्र सारे, बेफिकीरी घातकी ही!
लाण्डग्यांनीं कोकरें नेलीं किती ती दाद नाहीं!
फोडिती टाहो कधींचा सात कोटी धर्मबंधू,
त्वत्कराचा स्पर्श नाहीं, श्रेष्ठतेला आग लावीं!
त्या अनाथा हात देती कोण तें का पाहसी ना?
ग्लानि धर्माची तुझ्या या वर्तनें का होत नाहीं?
'काय त्याचें हो मला?' बोलून डोळे झाकितोसी,
जागृती येणार केव्हां? बोल भाई! बोल भाई!
ऊठ, जागा हो रघुवीरा, श्रीहरी तूं ओळखीं गा.

धर्म याची साह्य तूझें, शक्तियुक्ती वेच कांहीं !
दुम्‌दुमूंदे गर्जनेनें आज हा दिक्‌प्रांत सारा,
दुन्दुभीचा नाद जाऊनी भिडूं दे अन्तराळीं !
नाचवीं झेण्डा यशाचा कर्मयोगाच्या बळाचा,
राष्ट्रधर्मा वाचवाया धाव बापा, धाव घेई !
पाजळोनी दीपिका त्वत्पूर्वजांच्या सत्कृतींची
धर्मवित्तातें हराया कोण आले, नीट पाहीं !
भेद सोडोनी पहा, साह्यास तूझ्या वीस कोटी
वीर पाठीशीं उभे, ज्यांच्या भयें कांपे महीही !
धर्म तूझा, देश तूझा, मृत्युच्या दारीं उभे हे
हिन्दु ना तूं हिंदवासी ? ऊठ भाई ! ऊठ भाई !
हिन्दु ना तूं हिंदवासी ? बोल भाई ! बोल भाई !
रोकडा दे जाब, ठेवीं मागती ना बोल कांहीं !

वसई, २९ जुलै १९२७.

# ३७. मातृभाषा

[ गज़ल ]

जिच्यासाठीं बुभु:कारें समर्थांची स्फुरे वाणी.
जिला मुक्तेश्वरी साज नवी तेजस्विता आणी !
जिनें पंतांचिया अंकीं सदा लाडांत लोळावें,
जिनें कृष्णा[१]चिया संगें नव्या गानांत रंगावें !
जिच्या साठीं प्रतिष्ठा[२]नीं उदेली वैखरी दिव्या,
जिची कीर्ती दिगंतीं ने हरी ती कां नसे भव्या !
जिच्या कासेंत व्याघ्रीचें भरोनी दुग्ध गोंजारी
सखा विष्णू[४] जिचा तीची कशाला वाढुं मी थोरी !
दऱ्याखोऱ्यांतलीं पुष्पें जिच्यासाठीं खुडी बाळ[५]
जिच्या कंठामध्यें शोभे स्वयें राम[६]प्रभू लाल !
सदा जागा तिचा सिंह तियेची लाज राखाया
कुणाचीही नसे छाती तिला रोखून पहाया !
असेना मातृभाषा ती कशीही ती प्रिया मातें !
अशांनीं सेविलें जीतें कशी ना ती प्रिया मातें !

---

१ केशवसुत. २ पैठण. ३ हरी नारायण आपटे. ४ विष्णुशास्त्री. ५ बाल कवी-ठोमरे. ६ राम गणेश गडकरी. ७ न चिं. केळकर.

पुणें, १८ मार्च १९२८.

# ३८. महाराष्ट्र यशोगीत

[ चालः—रत्नगर्भ गणपतिं समाश्रयामि ]

धन्य महाराष्ट्र-यशोगीत गाउं आदरें
ज्याचिया यशाविना सुगेय काय जगिं बरें ? ध्रु.

पावन गोदा कृष्णा भीवरा सुकन्यका,
तुंग सह्य विंध्य गिरिवरांचियाहि मालिका
भूषविती ज्या देशा, तोचि प्रिय अम्हां बरें ! १

संत, कवी, शोधक, तत्वज्ञ, राजकारणी
जेथले सुपुत्र मानधन न भीति लव मनीं;
स्वातंत्र्यास्तव मरणें ध्येय जयांचेंच खरें ! २

राकट तनु, अचल धैर्य, अतुल शौर्य जेथलें,
वीररत्नभूमि नाम सार्थ जेथ जाहलें;
साक्ष देति दुर्ग अजुनि, बघुनि चित्त गहिवरें ! ३

कोमलतनु, चारुशील देवता गृहींगृहीं,
गृहकृत्यीं कुशल, राजकारणीं, रणांत ही
तेजोबल निरखितां भरें रिपूंस कांपरें ! ४

शरणागत-भयहारक तोच महाराष्ट्र हा !
ईप्सितार्थसुख-दायक तोच महाराष्ट्र हा !
भिन्न धर्म, परि बोली एक, कुठें भेद-डरें ? ५

११

उज्वल इतिहास जया, भाविकाल रम्य तया,
कृतिनीं-नच वाचेनें-सत्य करूं वचना या.
मळवूं नच पूर्वज यश, झगडुं संगरीं निकरें ! ६
प्रिय देशा, त्वत्कारणीं देह आमुचा झिजो !
प्रिय देशा, त्वत्पूजनिं ध्येयबीज मनिं रुजो !
प्रिय देशा, घे मुजरा, सेवा घे याच करें ! ७
वन्दे मातरम् !

वसई, ३१ आगस्ट १९२७.

---

## ३९. वन्दे मातरम् !

वन्दे मातरम् ! धृ.

व्याकळून मन जातें,
दृष्टिपुढें तम दिसतें,
सहज गीत तें स्फुरतें
वन्दे मातरम् ! १

हीन दशा राष्ट्राची
जेव्हां हृदया जाची,
उठती शब्दमया वीची-
वन्दे मातरम् ! २

देशांतिल वीर तरुण
दिसति कसे हीन दीन
नुरलें वदण्याहि त्राण-
वन्दे मातरम् ! ३

कवटाळिति नैराश्या,
चैतन्याचि जाय लया,
कळवळतें मन हा हा !
वन्दे मातरम् ! ४

वस्त्र नसे नेसाया,
अन्न मिळेना खाया,
दुर्दिन हे निवटाया-
वन्दे मातरम् ! ५

वीरांना जन्म दिले
पांग तयीं फेडियले.
आज असे दिन आले !
वन्दे मातरम् ! ६

देशभक्त निपजावे,
देह तयीं झिजवावे-
देशकार्यि, तरि गावें-
वन्दे मातरम् ! ७

स्वातंत्र्योदय झाला,
दास्यराहु रगडुं चला,
ऐकवुं या काळाला-
वन्दे मातरम् ! ८

जेथ जेथ परवशता
हाणी पतिता लत्ता,
घुमवुं तिथें घोष अतां
वन्दे मातरम् ! ९

मातेनें जन्म दिला
मातृकार्यि वाहुं चला !
बोला 'जय जय !' बोला-
'वन्दे मातरम् ! १०

वन्दे मातरम् !

पुणें, ५ जुलै १९२५.

---

# यशोदायिनीवरील कांहीं अभिप्राय

वाङ्मय-तपस्वी श्री. किरात यांचा आशीर्वाद.

आपली ' यशोदायिनी ' मीं काल रोजीं एकाच बैठकींत वाचून टाकली. ही वाचून मला आनंद झाला. आपल्या सर्वच कविता भावनाप्रधान आहेत. भावनेची तार आपण जसजशी चढवितां तसतसे आपण वाचकांना निरनिराळ्या वातावरणांत घेऊन जातां असा माझा अनुभव आहे...... आश्वासन दिल्याप्रमाणें काव्याची नवसृष्टी रचून तिच्यांतून काव्यरत्नें उधळून सुरासुरांना आनंदित करण्याला दीर्घायु व आरोग्य तो दयाधन परमेश्वर आपल्यास देवो !...

क्रु. ल. सोमण ( बेळगांव )

कुसुमें विश्वोद्यानीं ग्रथुनी केली सुरम्य ही माला !
माला कंठीं घालुनि सजविलि मोदें यशोद कविबाला !
रम्य प्रेमळ सात्त्विक मोहक सुंदर अती रसाळ कथा,
यदृच्छेनें रचिल्या न दिसे गीतीं कुठेंहि यत्न वृथा.
शोभा सौलभ्याची द्विगुणित झाली रसामुळें नाना;
दरवळुंदे महाराष्ट्रीं सुमसौरभ ! यश मिळो सदा कविंना !

ऋग्वेदी (विलेपार्ले).

विषयाची विविधता नसली तरी चालीची विविधता व गेयता मनोरंजनास पुरेशी आहे. भाषा सोपी व मधुर आहे. प्रसाद, वात्सल्य व देशप्रेम हें या कवितांतून स्पष्टपणें नजरेस येतें. कल्पना व उपमाहि बऱ्यापैकीं आहेत. भावना हेंच प्रायः सर्व पद्यांचें मूळ अधिष्ठान असल्यानें कांहीं भावगीतें सरस उतरलीं आहेत.

केसरी तारीख १७।४।२८

यशोदांच्या कवितेंत सरसता व माधुर्य हे गुण पुष्कळच आढळतात. ' रम्य बाळपण, ' ' चिरंजीविनी यशोद, ' ' पारिजात कुसुम, ' ' मंजु गान ' वगैरे कविता उत्कटभावपूर्व व मंजुळ आहेत. काव्यांतील रचनादोषाकडे

जर यशोदांनीं अधिक लक्ष दिलें, तर काव्यदेवतेची उपासना त्यांना निस्संशय यशोदायक होईल.

महाराष्ट्र ता. २९।४।२८

या कवितासंग्रहांतील बऱ्याच कविता चांगल्यापैकीं असून मूक जीव, चांदबिबीचें पुण्यस्मरण, हिंदुसंघटन, रोकडा सवाल, महाराष्ट्र यशोगीत वगैरे कविता आम्हाला विशेष चांगल्या वाटल्या.

त्यांच्या कवितेंत कित्येक ठिकाणीं ओजस्वीपणा व तेजस्वीवृत्ती आढळून येतात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कित्येक कवींना वीररस अगदींच वावडा वाटतो, तशी यांची गोष्ट नाहीं.

उच्च भावना कवीनें ठिकठिकाणीं जागृत केल्या आहेत ही समाधानाची गोष्ट होय. या पुस्तकाला शेवटीं जे अभिप्राय जोडले आहेत, त्यांतून कवीच्या या प्रसिद्ध झालेल्या कवितांवरून त्यांच्या भावी कामगिरी-बद्दल जी सदाशा व्यक्त केली आहे, ती योग्य असून तीस आम्हीही दुजोरा देतों.

टणत्कार ता. १-७-२८

निव्वळ प्रेमगीतांपेक्षा वात्सल्य गीतें कवीच्या जास्त आवडीचीं दिसतात. ' लाडक्या तारेस, ' ' चि. यशोद, 'परिजात कुसूम ' वगैरे कविता साधारण बऱ्या आहेत. ' हलवा, ' ' आर्य कन्येचे डोहाळे, ' ' लाकूडतोड्या आणि सारंगी, ' मूक जीव. , ' तुझा तिळगूळ ' या कवितांतल्या कल्पना स्वतंत्र व चांगल्या आहेत. कुमार यशोदांची स्फूर्ति याच्याहून सुंदर व सुगंधी काव्यसुमनें प्रसवूं शकेल अशी आशा या कवितासंग्रहावरून करण्यास हरकत नाहीं.

विविध-वृत्त ता. २४।६।२८

यशोदायिनी हें पहिलें पुस्तक ' कुमार यशोद ' यांच्या सुमारें ४० लहान मोठ्या कवितांचें सुंदर व सचित्र पुस्तक असून यांत दिव्य-प्रेमाची वाखाणणी केलेली आहे. प्रत्येक कविता प्रसादयुक्त असून परिणामका-रक आहे. यांतील ' रम्य बालपण, ' ' चिरंजीविनी यशोद, ' ' हरवलेली

बांसरी,' 'दिव्यभक्ती' वगैरे कविता वाचतां वाचतां मन तन्मय होऊन जातें. प्रत्येक कवितेंत भावनांचा परिपोष चांगला साधला आहे.

बलवंत ता. २।७।२८

पुस्तकाचें बहिरंग आकर्षक आहे तसेंच अंतरंगहि कित्येक ठिकाणीं बहारदार झालेलें आहे. बालकांच्या बाललीलांत कवि चांगला रंगलेला दिसतो. कांहीं ठिकाणीं कवीची कल्पनाशक्ति बरीच मजेशीर वाटते. भाषेसंबंधीं विद्वानांचे अभिप्राय पुस्तकाच्या शेवटीं जोडले असल्यानें आम्हांस लिहिण्याचें कारण नाहीं. कुमार यशोद यांच्या या पहिल्याच प्रयत्नावरून भविष्यकालीं ते महाराष्ट्राचे 'एक नामांकित कवि' अशी कीर्ति मिळवितील अशी आशा वाटते.

किर्लोस्कर खबर—जून १९२८

कवि **कुमार यशोद** यांचें नांव सर्व विश्रुत आहे. त्यांच्या 'यशोदायिनी'वर पुष्कळ विद्वद्वर्यांनीं आपले अनुकूल अभिप्राय देऊन गुणग्राहकता व्यक्त केली आहे. कुमार यशोद यांच्या कविता या टापूंत पुष्कळच लोकप्रिय झालेल्या आहेत. त्यांच्या भाषेंतील सोपेपणा व कल्पनेंतील रम्यता यामुळें त्यांची कविता लहानांपासून थोरापर्यंत सर्वांनाच प्रिय होण्यासारखी आहे.

साष्टी समाचार ४।८।२९

या कवीच्या कविता भावनात्मक असल्यामुळें त्यांना विशेष गोडी आली आहे. या पुस्तकांत चि. यशोद, पारिजात कुसुम, लाडकी तारा, हरवलेली बांसरी, कृष्णप्रबोधन, वगैरे कविता मधूर आहेत. दिव्य–भक्ति ही कविता तर फारच उत्तम वठली आहे. कवीच्या या कविता बाल्यावस्थेंतील असल्यामुळें कीं काय कवीला बाळपणींच्या प्रसंगावरील कविता उत्तम साधल्या आहेत. कु. यशोद यांची यशोदायिनी त्यांना यशाच्या मंदिराकडे नेवो असें आम्ही इच्छितों.

उषःकाल.

कविता भावगीतें असून प्रेम, बालस्वभाव, सृष्टिसौंदर्य, राष्ट्रीय भावना, धर्म इत्यादि विषयांवर आहेत. बाललीला वर्णन करण्याकडे आणि बालहृदयाचें चित्र रेखाटण्याकडे कांहीं कवींनीं उपक्रम सुरू केला आहे

ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या विषयाकडे कवि दुर्लक्ष करीत असतात. ह्या विषयावर हृदयंगम काव्यरचना करणें शक्य नाहीं काय ? रवींद्रबाबूंचा 'क्रेसन्ट मून ' हा काव्यसंग्रह ह्या एकाच विषयावर लिहिलेला आहे. पोस्ट ऑफिस ह्या दृश्यकाव्यांत त्यांनीं बालस्वभावाचें मार्मिक चित्र दाखविलें आहे. कुमार यशोद यांच्या कवितेची भरारी जरी मोठी नसली तरी त्यांनीं आपल्यापरीनें बाललीलांचें व स्वभावाचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे व त्यांत त्यांना यश आलें आहे.

ह्याप्रमाणें प्रस्तुत काव्यसंग्रहाचें स्वरूप आहे. व रसिकजनास हा संग्रह मान्य होईल अशी आशा आहे.

नवा काळ ता. १०।५।२८

३०८८.
REFBK-0003969
REFBK-0003969